मंगळवार, १८ ऑक्टोबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ९१
www.ramprahar.com
# रामप्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

एजन्सी देतो सांगून २४ लाख लुबाडले/२
अलिबाग तालुक्यातील दोन्ही ग्रामपंचायतींत शेकाप पराभूत/५
टी-२० वर्ल्डकप : विंडीजचा स्कॉटलंडकडून पराभव/८

## सरन्यायाधीशपदी चंद्रचूड यांच्या नावावर शिक्कामोर्तब



**नवी दिल्ली :** न्यायमूर्ती धनंजय यशवंत चंद्रचूड यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान सरन्यायाधीश उदय लळीत यांच्या निवृत्तीनंतर ते या पदाची शपथ घेणार आहेत. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अधिकाराचा वापर करून राष्ट्रपतींनी डॉ. न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांची ९ नोव्हेंबरपासून भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. मे २०१६मध्ये न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला होता. त्यांचे वडील यशवंत विष्णू चंद्रचूड हेही देशाचे सरन्यायाधीश राहिले आहेत. विशेष म्हणजे सर्वाधिक काळ मुख्य न्यायाधीश राहण्याचा विक्रम यशवंत चंद्रचूडच्या नावावर आहे. ते १९७८ ते १९८५ या काळात सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होते.

# ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपचा गुलाल!

## पुन्हा एकदा सर्वांत मोठा पक्ष -उपमुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यात झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. हाती आलेल्या निकालापैकी ८८९पैकी सर्वाधिक ३९७ ठिकाणी भाजपचा विजय झाला असल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. १७) माध्यमांशी बोलताना केला.**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भाजप पुन्हा एकदा सर्वांत मोठा पक्ष म्हणून राज्यात पुढे आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजप हे महाविकास आघाडीच्या एकत्रित आकड्यापेक्षा खूप पुढे आहेत. या वेळी त्यांनी भाजपवर विश्वास दाखविल्याबद्दल जनतेचे आभार मानले तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

***अंधेरी पोटनिवडणुकीत आम्हाला निवडून येण्याची पूर्ण खात्री होती. तथापि काहींनी आम्हाला विनंती केली. त्यावर विचार करून मी स्वत: मुख्यमंत्र्यांशी बोललो. आमच्या वरिष्ठांशी बोललो. टीमशी चर्चा केली आणि यानंतर माघारीचा निर्णय आम्ही घेतला आहे.***
***-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री***

## खेरणे ग्रामपंचायतीमध्ये कमळ फुलले

### शेकापची २५ वर्षांची सत्ता भाजपने उलथवली; शैलेश माळी थेट सरपंचपदी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ शेकापच्या ताब्यात असलेल्या खेरणे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाजपने शेकापला धूळ चारली आहे. येथे थेट सरपंचपदी भाजपचे शैलेश बाळाराम माळी विजयी झाले आहेत.

पनवेल तालुक्यात झालेल्या एकमेव खेरणे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा निकाल सोमवारी (दि. १७) जाहीर झाला. या ग्रामपंचायतीत शेकापने सत्तेचा वापर नेहमीच स्वार्थासाठी केला. त्यामुळे सुज्ञ मतदारांनी भाजपला कौल दिला. ही सत्ता उलथवून टाकण्यासाठी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

थेट सरपंचपदी भाजपचे शैलेश माळी विजयी झाले असून सदस्यपदी रूपाली चंद्रकांत गोंधळी, राजेंद्र आत्माराम गोंधळी, अशोक गणपत गोंधळी, सुभद्रा संतू माळी, अक्षता सचिन पाटील निवडून आले आहेत. या सर्वांचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व इतर पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. या वेळी तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, माजी जि. प. सदस्य एकनाथ देशेकर, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, शिक्षक सेलचे जिल्हा संयोजक के. सी. पाटील, बुधाजी माळी, महेश पाटील, प्रकाश खैरे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**खेरणे ग्रामपंचायतीमधील हा विजय भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचा विजय आहे. या ग्रामपंचायतीमध्ये २५ वर्षे शेकापने राज्य केले. अखेर त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे.**
**-शैलेश माळी, नवनिर्वाचित सरपंच, खेरणे ग्रामपंचायत**

# अंधेरी पोटनिवडणुकीतून भाजपने घेतली माघार

### महाराष्ट्राच्या संस्कृतीनुसार निर्णय -प्रदेशाध्यक्ष बावनकुळे



**मुंबई : प्रतिनिधी**

अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट) युतीचे उमेदवार मुरजी पटेल यांनी आपला अर्ज मागे घेतला आहे. कै. आमदार रमेश लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके या निवडणुकीत विजयी होण्यासाठी भाजपने हा महाराष्ट्राच्या संस्कृतीनुसार निर्णय घेतला, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की, एखाद्या आमदाराचे निधन झाले आणि त्यांच्या परिवारातील कोणी निवडणूक लढवत असेल तर निवडणूक बिनविरोध करण्याची महाराष्ट्रात संस्कृती आहे. भाजपने यापूर्वी अनेकदा असा निर्णय घेतला आहे तसेच नव्याने निवडून येणाऱ्या आमदाराला जेमतेम एक दीड वर्ष कालावधी मिळणार आहे. त्यामुळे पक्षाने उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला.

केंद्रीय आणि राज्य नेतृत्वाने हा निर्णय घेतला. राज्यासाठी संवेदनशील निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांचे आपण आभार मानतो, असेही प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी म्हटले आहे.

### राज ठाकरे यांनी मानले उपमुख्यमंत्री फडणवीसांचे आभार



भाजपने अंधेरी पूर्व विधानसभा निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून त्यांचे आभार मानले आहेत. याआधी राज यांनी ही निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री फडणवीस यांना पत्राद्वारे केले होते. भाजपने महाराष्ट्रातील राजकीय परंपरेचे पालन करीत आपले उमेदवार मुरजी पटेल यांची उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटके यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

**माझी भाजपकडे कोणतीही मागणी नव्हती. मी त्यांना कसे काय सुचवू शकतो. मी फक्त सल्ला दिला होता. सुचवल्यानंतर काहीतरी सकारात्मक निर्णय घेतला जाईल अशी आशा होती. तसा निर्णय घेतला याचा आनंद आहे.**
**-खासदार शरद पवार, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**

**एखाद्या लोकप्रतिनिधीचा मृत्यू झाल्यास त्याला श्रद्धांजली म्हणून घरातील कुणाला उमेदवारी दिली असेल, तर आपण ती निवडणूक बिनविरोध करतो अशी महाराष्ट्राची परंपरा आहे. भाजपने त्यास प्रतिसाद दिला. याबद्दल भाजपचे मी मनापासून खास आभार मानतो.**
**-आमदार अनिल परब, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे**

## निवडक

### नरेंद्र पाटील पुन्हा महामंडळ अध्यक्षपदी

**कराड :** माथाडी कामगारांचे नेते, माजी आमदार नरेंद्र पाटील यांची अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे. मराठा समाजातील मुलांना व्यावसायिक कर्ज मिळावे यासाठी नरेंद्र पाटील यांचे मोठे योगदान आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर त्यांना पदावरून हटविण्यात आले होते. त्यानंतर हे पद रिक्त होते. आता भाजप-शिंदे सरकारने सोमवारी (दि. १७) त्यांची पुन्हा नियुक्ती केल्याचे जाहीर केले.

### विश्वविजेत्या कार्लसनला पराभूत करीत गुकेशने रचला इतिहास

**चेन्नई :** भारताच्या १६ वर्षीय दोन्नारुमा गुकेशने इतिहास रचला. त्याने जलद ऑनलाइन स्पर्धेत विश्वविजेत्या मॅग्नस कार्लसनला पराभवाचा धक्का दिला. याचबरोबर गुकेश विश्वविजेत्या खेळाडूला मात देणारा सर्वांत तरुण बुद्धीबळपटू बनला. कार्लसेनचा भारतीय ग्रँडमास्टर अर्जुन एरिगैसीनेही पराभव केला होता.

## समग्र रायगड कॉफी टेबल बूकचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील उपयुक्त माहितीचे संकलन असलेल्या जिल्हाधिकारी समग्र रायगड पर्यटन, पर्यावरण, सक्षमीकरण या कॉफी टेबल बूकचे प्रकाशन सोमवारी (दि. १७) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात झाले.

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या समग्र रायगड पर्यटन, पर्यावरण, सक्षमीकरण या कॉफी टेबल बूकमध्ये प्राचीन लेणी, गड किल्ले, समुद्रकिनारे, वॉटर स्पोर्ट्स, धरणे, बंदरे, धबधबे, गिरीस्थाने, अभयारण्य, ऐतिहासिक व धार्मिक ठिकाणे अशा पर्यटनस्थळांसोबतच उद्योग-कारखाने, स्थानिकांच्या सक्षमीकरणासाठी नाविन्यपूर्ण योजना, पर्यटकांसाठी मार्गदर्शक नकाशे अशा उपयुक्त माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

प्रकाशन समारंभास राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत तसेच राज्याचे मुख्य सचिव मनूकुमार श्रीवास्तव, रायगड जिल्हाधिकारी तथा कोकण विभागीय प्रभारी आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कॉफी टेबल बूक तयार करण्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप व मीडिया आर अ‍ॅण्ड डीचे दिलीप कवळी यांचे विशेष सहकार्य लाभले.

## मोदी सरकारचे शेतकऱ्यांना मोठे गिफ्ट

### एकाच ठिकाणी मिळणार बियाणे, खते, उपकरणे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि. १७) नवी दिल्ली येथे आयोजित किसान सन्मान संमेलनात देशातील ३.३ लाख किरकोळ खत दुकानांचे प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्रामध्ये (पीएमकेएसके) रूपांतर करण्याची घोषणा केली. ही दुकाने टप्प्याटप्प्याने पीएमकेएसकेमध्ये बदलण्यात येणार असून या केंद्रांवर एकाच छताखाली बियाणे, खते, उपकरणे तसेच माती परीक्षण सुविधा उपलब्ध होणार आहे.

किसान सन्मान संमेलनात एक कोटीहून अधिक शेतकरी व्हर्च्युअल माध्यमातून सहभागी झाले होते. या संमेलनादरम्यान शेतीशी संबंधित १५०० स्टार्टअप्स लाँच करण्यात आले. यासोबतच खताशी संबंधित ‘इंडियन एज’ नावाचे ई-मासिकही सुरू करण्यात आले.



याशिवाय पीएमकेएसके केंद्रांवर शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित विविध योजना, गोष्टींची माहिती करून दिली जाणार आहे. जिल्हा स्तरावर किमान एका किरकोळ दुकानाला मॉडेल शॉप म्हणून विकसित केले जाईल अशी सरकारची योजना आहे. या अंतर्गत जवळपास ३,३०,४९९ किरकोळ खतांची दुकाने पीएमकेएसकेमध्ये रूपांतरित केली जातील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी ६०० नवीन पीएमकेएसके केंद्रांचे उद्घाटन केले. या केंद्रांवर केवळ खतेच उपलब्ध होणार नाही, तर बियाणे, उपकरणे, माती परीक्षण आणि शेतकऱ्यांशी संबंधित सर्व प्रकारची माहिती उपलब्ध होणार आहे, असे या वेळी पंतप्रधान मोदींनी सांगितले.

### ‘पीएम किसान’ निधी वितरित

*या किसान सन्मान संमेलनावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान सन्मान निधीचा १२वा हप्ता पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर पाठवला. विशेष म्हणजे केंद्र सरकार दर चार महिन्यांनी एकदा शेतकऱ्यांना दोन हजार रुपयांची आर्थिक मदत करते. यापूर्वी सरकारने ११ हप्ते जारी केले आहेत. या वेळी जवळपास १० कोटी शेतकऱ्यांच्या खात्यावर पीएम किसान सन्मान निधीची रक्कम पाठवण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी आनंदात जाणार आहे.*

## पनवेलमध्ये आज बाल नाट्य स्पर्धेची कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दोन वर्षांच्या कठीण काळानंतर आता शाळा नव्या उत्साहात सुरू झाल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या ऊर्जेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल यांनी केलेला आहे. त्या अनुषंगाने मंगळवारी (दि. १८) मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सायंकाळी ४ वाजता बाल नाट्य स्पर्धेची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत बालनाट्यांचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजू तुलालवार मार्गदर्शन करणार आहेत.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेलचे शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मागील सोळा वर्षे या दोन्ही संस्था अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा अतिशय भव्य दिव्य स्वरूपात आयोजित करीत आहे. या स्पर्धेत अनेक होतकरू रंगकर्मींनी आपला ठसा उमटवून व्यावसायिक नाट्य क्षेत्रात यशस्वी पदार्पण केलेले आहे.

पनवेल-उरण परिसर सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असून हा कलाकारांचा प्रदेश आहे. येथील विद्यार्थ्यांमधील अभिनय कलेला प्रोत्साहन मिळावे, त्यांना रंगमंच उपलब्ध व्हावा त्याचबरोबर एक सृजनशील पिढी तयार व्हावी म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. प्रत्येक बालकात उपजतच एक नट दडलेला असतो. याचा अनुभव आपण रोज घेतो. त्यामुळे बाल नाट्य निर्माण करणाऱ्या मार्गदर्शकांना त्यांच्या शंकांचे निरसन आणि प्रोत्साहन देण्यासाठी परिषदेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले असून या कार्यशाळेत जास्तीत जास्त इच्छुकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## दिवाळीनिमित्त मुंबई लखलखणार!

### विद्युत रोषणाई करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीनंतर सत्तेत आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस सरकारने कोविडमुळे सण-उत्सवांवर लावलेले निर्बंध उठविण्यात आले आहेत. शिंदे-फडणवीस सरकारने सर्वच कार्यक्रम निर्बंधमुक्त साजरे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानंतर आता मुख्यमंत्री शिंदे यांनी यंदा दिवाळीत मुंबई शहर विद्युत रोषणाईने सजणार असल्याची घोषणा केली आहे.

दिवाळीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मतदारसंघ असलेले ठाणे शहर दरवर्षी विद्युत रोषणाईने सजवले जाते. आता ठाण्याच्या धर्तीवर दिवाळीत मुंबई शहरातदेखील न भुतो न भविष्यति अशी विद्युत रोषणाई मुंबई पाहायला मिळणार आहे.

दरम्यान, राज्यातील दारिद्र्यरेषेखालील अर्थात पिवळे रेशनकार्ड असणाऱ्या जनतेची दिवाळी आनंदात जावी म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील एक कोटी ८० लाख गोरगरीबांना दिवाळी फराळासाठी लागणारे आवश्यक साहित्य १०० रुपयांमध्ये उपलब्ध करून देण्याची घोषणा केली होती. रेशन दुकानात हे साहित्य मिळणार आहे. रवा, चणाडाळ, साखर प्रत्येकी एक किलो आणि एक लिटर पामतेल यांचा समावेश असलेले कीट मिळणार आहे.

राज्यातील एक कोटी ८० लाख कुटुंबांना म्हणजेच सुमारे सात कोटी लोकांना याचा प्रत्यक्ष लाभ होणार आहे. या योजनेसाठी येणाऱ्या एकूण ४८६ कोटी ९४ लाख खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.

## संजय राऊतांच्या जामीन अर्जावरील सुनावणी तहकूब

**मुंबई : प्रतिनिधी**

पत्राचाळ घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीच्या अटकेत असलेल्या शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या जामीन अर्जावर सोमवारी (दि. १७) सुनावणी होऊ शकली नाही. ही सुनावणी मंगळवारपर्यंत तहकूब करण्यात आली आहे.

यापूर्वी १० ऑक्टोबरला संजय राऊत यांच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली होती. त्या वेळी त्यांच्या कोठडीत सात दिवसांची वाढ करण्यात आली. ही मुदत संपल्यानंतर सोमवारी त्यांना पीएमएलए कोर्टात हजर करण्यात आले, मात्र आजही त्यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे राऊतांना पुढील निर्णयासाठी आणखी एक दिवस वाट पहावी लागणार आहे.

# अपघाताला कारणीभूत ब्लॅक स्पॉट दूर करा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मंत्रिमंडळ बैठकीत निर्देश



### वारंवार नियम मोडणाऱ्यांचा वाहनपरवाना निलंबित करावा -उपमुख्यमंत्री

ज्या वाहनचालकांवर पाच ते सहा वेळा दंडाची कारवाई झाली आहे त्यांचा वाहन परवाना काही दिवस, महिन्यांसाठी निलंबित करण्याची कारवाई करण्याबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी निर्देश दिले. द्रुतगती महामार्गावर वेगाने मार्गिका बदलणाऱ्या (लेन जंप) वाहनचालकांवर कारवाईसाठी पथक नेमावे. या पथकाच्या माध्यमातून बेदरकारपणे वाहन चालविणाऱ्यांवर नजर ठेवतानच त्यांचा पाठलाग करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची मोहीम हाती घेण्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. जगातील सर्वांत स्मार्ट वाहतूक सुरक्षा व्यवस्था समृद्धी महामार्गावर कार्यान्वित करण्यात यावी, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी निर्देश दिले.

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात रस्त्यांवर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे घोषित करण्यात आलेले ब्लॅक स्पॉट तातडीने दूर करावेत, असे निर्देश देतानाच राज्यात २३ ठिकाणी आधुनिक वाहन चाचणी केंद्र तसेच वाहन परवान्यासाठी स्वयंचलित वाहन चलन चाचणी पथ स्थापन करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे सांगितले.

जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांनी आपल्या हद्दीतील ब्लॅक स्पॉट दूर करण्यासाठी समन्वयाने काम करावे. वर्षातून किमान तीन वेळा रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी सोमवारी (दि. १७) येथे दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे रस्ता सुरक्षा विषयक उपाययोजना व सुधारित धोरण ठरविण्याबाबत बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी चव्हाण, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव आशीषकुमार सिंह, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर आदींसह विविध विभागांचे सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यात होणाऱ्या रस्ते अपघातांमध्ये जीवितहानीचे प्रमाण जास्त आहे. ज्या रस्त्यांवर वारंवार अपघात होतात त्या ठिकाणी ब्लॅक स्पॉट घोषित झाले आहेत. ते तातडीने दूर करावेत. ज्या विभागांच्या अखत्यारित असे रस्ते, महामार्ग आहेत, त्यांनी हे ब्लॅक स्पॉट दूर करण्यासाठी त्वरीत कार्यवाही करावी. शाळा, महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमांद्वारे रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती करण्यात यावी, असे सांगतानाच राज्यभर हेल्मेट सक्तीची प्रभावी अमंलबजावणी करावी, वाहनचालक प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या.

# स्वच्छताविषयक उपक्रमांतर्गत कचरा विलगीकरण जनजागृती



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत सर्वेक्षण २.० मोहीम आणि माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत कचरा विलगीकरणाचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्याकरिता स्वच्छता का उपहार हा कार्यक्रम १६ ते २२ ऑक्टोबर यादरम्यान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता के दो रंग हरा गिला, सुखा निला या उपक्रमाचे आयोजन खारघर, कामोठे, कळंबोली, पनवेल अशा चारही प्रभागांमध्ये ५०हून अधिक सोसायट्यांमध्ये त्याचप्रमाणे ४० शाळांमध्ये करण्यात आले आहे.

उपायुक्त सचिन पवार यांच्या सूचनेनुसार या उपक्रमामध्ये इन्फिनीटी फाउंडेशनचे सदस्य आणि महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षकही भाजी बाजार, मच्छी बाजार चौकाचौकांमध्ये कचरा वर्गीकरण जनजागृती कार्यक्रम राबवित आहे. ४० शाळांमध्ये महापालिकेच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना ओला कचरा व सुक्या कचऱ्याचे विलगीकरणाचे महत्त्व पटवून सांगण्यात आले. ओला कचरा व सुका कचरा वेगळा केला असता ओल्या कचऱ्यापासून चांगल्या पद्धतीने कंपोस्ट खत व सुक्या कचऱ्यापासून पुनर्वापर करणाऱ्या वस्तू तयार करता येतात, असा संदेश विद्यार्थ्यांना दिला जात आहे.

या उपक्रमांतर्गत पनवेल प्रभागामध्ये वडाळे तलाव, शिवाजीनगर झोपडपट्टी, प्रभाग १४, तक्का गाव कर्नाळा सर्कल भाजी बाजार याठिकाणी स्वच्छता निरीक्षकांनी पोस्टर, बॅनरच्या माध्यमातून ओल्या व सुक्या कचऱ्याविषयी जनजागृती केली. सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, विभागप्रमुख अनिल कोकरे, अधिकारी स्वच्छता के दो रंग हरा गिला, सुखा निला कार्यक्रमाचे महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी आयोजन करीत आहेत.

# नवीन पनवेलमधील स्वीटमार्टवर अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधील द्वारका स्वीट्स, गणेश स्वीटस ॲण्ड नमकिन, श्री द्वारका स्वीट्स व बंधन स्वीट्स येथील पेढ्याचे नमुने जनजागृती ग्राहक मंचाच्या तक्रारीवरून अन्न व औषध प्रशासनाने तपासणीसाठी नेले आहेत. त्याचा अहवाल आल्यावर संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त ल. अं. दरडे यांनी दिली आहे.

जनजागृती ग्राहक मंच पनवेल यांनी अन्न व औषध प्रशासनाचे पेण येथील सहाय्यक आयुक्त ल. अं. दरडे यांच्याकडे ९ ऑगस्ट रोजी नवीन पनवेल सेक्टर १९मधील द्वारका स्वीट्स या दुकानात विक्रीला असलेल्या चॉकलेट चीज (इंपोर्टेड) वर त्याची किंमत व आयातदाराचा पत्ता नसल्याची तक्रार केली होती. त्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन तेथील २२५ रुपयांचे ४० ग्रॅम वजनाचे तीन कंपनी पॅक सिल्ड प्लॅस्टिक बकेट जप्त केले आहेत. सेक्टर ८मधील गणेश स्वीटस ॲण्ड नमकिन, सेक्टर ३मधील श्री द्वारका स्वीट्स व सेक्टर ३मधील बंधन स्वीट्स येथे ही तपासणी केली असता त्या ठिकाणी तक्रारीत नमूद केलेला माल न सापडल्याने तेथील विश्लेषणासाठी घेतलेल्या अन्नमालाचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्याबाबत कारवाई करण्यात येणार आहे.

# जासई कॉलेजमध्ये एचएससी बोर्ड फॉर्म भरण्याची प्रक्रिया

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये इ. बारावीत शिकत असलेले आणि फेब्रुवारी २०२३मध्ये प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे एचएससी बोर्डाचे फॉर्म भरण्यात आले.



शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष व भारतीय मजदुर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर व विद्यालयाचे प्राचार्य अरुण घाग यांनी अध्यक्षांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या, तसेच विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका एस. एस. पाटील तसेच रयत सेवक संघाचे महाराष्ट्राचे समन्वयक शेख यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख एस. एस. शिंदे, बारावीचे विज्ञान शाखेचे वर्गशिक्षक प्रा. देवरे व कला वर्गशिक्षक प्रा. समीर पाटील यांनी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे फॉर्म भरण्यासंदर्भात मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

# साबणाची एजन्सी देतो सांगून २४ लाख लुबाडले

**महाड : प्रतिनिधी**

साबणाची एजन्सी देतो असे सांगून एका व्यापाऱ्याची २४ लाख ३२ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या चौघांविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यातील वावे येथील उस्मान शेख हुसेन करबेलकर यांनी याबाबत तक्रार दाखल केली आहे. उस्मान करबेलकर हे हॉटेल व्यावसायिक असून त्यांना एप्रिल महिन्यामध्ये मोहम्मद शरीफ इब्राहिम काझी (रा. मिरज), मोहम्मद नायानी, जमीर मकानदार आणि अमीर रफिक शेख (तिघेही रा. सांगली) हे पंचरत्न डिटर्जंट कंपनीच्या साबणाची एजन्सी देण्याकरिता भेटले होते. या सर्वांनी एजन्सी देण्याचे आमिष दाखवून करबेलकर यांच्याकडून एप्रिल ते ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये या चौघांनी करबेलकर यांच्याकडून ११ लाख ४२ हजार ७५ रुपये रोख आणि आरटीजीएसद्वारे १२ लाख ९० हजार असे २४ लाख ३२ हजार ७५ रुपये उकळले. ही सर्व रक्कम घेऊनही करबेलकर यांना साबणाचा माल अथवा डिस्ट्रीब्यूटरशीप मिळाली नाही.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच करबेलकर यांनी महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये धाव घेतली व आपली तक्रार दाखल केली. त्यानुसार या चौघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास निरीक्षक मिलिंद खोपडे करीत आहेत.

# पनवेलमधील वाल्मिकीनगर येथे कलवट बांधकाम सुरू



## माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांचा पाठपुरावा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रातील महाराणा प्रताप रोडवरील वाल्मिकीनगर येथील नाल्यावर माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने कलवट बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे.

या रस्त्यावर नाला आहे. नगरपरिषद काळात बांधकाम केलेल्या या नाल्यावरचा स्लॅब हा आता कुचकामी होत चालला होता. या नाल्यावरील स्लॅबची अनेकदा डागडुजी करण्यात आली, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. उर्वरित स्लॅबचा भाग पूर्णपणे ढासळला आणि त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊ लागला होता. याबाबत नागरिकांनी माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्याकडे तक्रार केली होती. वाल्मिकी नगरला येण्या-जाण्यासाठी मुख्य रस्ता असल्याने विक्रांत पाटील यांनी तत्काळ महापालिकेला पत्र दिले आणि पूर्णपणे नवीन काँक्रिट कलवट बांधून घेण्याची मागणी केली. त्यांच्या यशस्वी पाठपुराव्याने या कलवट बांधकामाला सुरुवात करण्यात आली आहे. माझा प्रभाग माझी जवाबदारी या अनुषंगाने काम करणारे विक्रांत पाटील हे नेहमीच नागरिकांच्या समस्या सोडवण्यास प्रधान्य देत असतात. त्याबद्दल प्रभागातील नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.



**उलवे नोड : विलिमर्स मरीन सर्व्हिस हा व्यवसाय सेक्टर १७ येथे सुरू करण्यात आला आहे. या कार्यालयाचे उद्घाटन रविवारी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते झाले. या वेळी वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, जयवंत देशमुख, गव्हाणच्या सदस्य तथा भाजप उलवे नोड महिला मोर्चा अध्यक्ष योगिता भगत, भाऊ भोईर, सुधीर ठाकूर, कमलाकर देशमुख, आशिष घरत, कमलाकर घरत, सुहास भगत, दामोदर भोईर, अवदेश महातो, मनोज मोर्या, सुजाता पाटील, प्रिया शिंदे, संगिता कांबळे, आनंद शिंदे, गणेश पाटील उपस्थित होते.**


## दुखवटा

### रुपम पाटील



**उरण :** कोप्रोली गावचे सामाजिक कार्यकर्ते रुपम रामचंद्र पाटील यांचे नवी मुंबईतील अपोलो रुग्णालयात निधन झाले. ते ३६ वर्षांचे होते. त्यांचा दशक्रिया विधी २४ ऑक्टोबरला श्री क्षेत्र माणकेश्वर येथे, तर उत्तरकार्य कोप्रोली येथे २७ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, आई, वडील, भाऊ, भावजय, बहीण असा त्यांचा परिवार आहे.

### बबन मांडवकर



**पनवेल** : लाडिवली येथील ज्येष्ठ नागरिक बबन बंडू मांडवकर यांचे वृद्धत्वाने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात मुलगा गणेश, सून, नातवंडे असा परिवार आहे. प्रेमळ आणि हसतमुख स्वभाव राहिलेले बबन मांडवकर हे 'आप्पा' नावाने ओळखले जात. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि. १८) श्री क्षेत्र गुळसुंदे येथे, तर उत्तरकार्य लाडीवली येथे शुक्रवारी (दि. २१) होणार आहे.


**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, माणगांव**
**जल जीवन मिशन ई-निविदा सुचना क्र. १५ सन २०२२-२३**
**(दुबार मागणी)**

तोंडसूरे पाणी पुरवठा योजना, ता.म्हसळा, जि.रायगड या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रू.६.४२ कोटी आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि.१८/१०/२०२२ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्वतारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक : १२/१०/२०२२

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग माणगांव**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मौजे भिंगार, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील जमिनीचे विद्यमान मालक १. रसिका रमेश कुरंगळी, २. रमेश नामदेव कुरंगळी, रा. भिंगार, यांचे कडून आमचे अशिल श्री. चिन्मय जगदिश बरडे यांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे :

मौजे - भिंगार , ता. पनवेल, जि.रायगड येथील मिळकत

| जमिन मालकाचे नांव | भूमापन कमांक /हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| रसिका रमेश कुरंगळी<br>रमेश नामदेव कुरंगळी | १३१/१ | ०-१०-३५<br>०-०७-३५<br>पो.खराबा ०-०३-०० | ३.७५ |
| | | एकूण क्षेत्र ०-१७-७० | |

प्राप्त परिस्थिती वरील परिशिष्टात नमुद जमिन मिळकती मध्ये वा कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करारमदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, समजोता करार, अखत्यारपत्र एम.ओ.यु., वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबध असल्यास त्या व्यक्तींनी व संबधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आंत आपल्या हक्क हितसंबधाचे स्वरूपी विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्या पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे, वरील कोणाकडून काही लेखी हरकत , तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क हितसंबध नाही. असे समजून आमचे पक्षकार सदर जमिन मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिव पूर्वक सोडून दिल्या आहेत. असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही**
**ॲड. कांचन एस.पाटील**
**पत्ता :** १३३७/ब/२, शिवाजी पाटील निवास प्रभू आळी पनवेल, जुने पनवेल, जि.रायगड. मो.नं. ८६८९८०९८९६, ८१०८८८२६११


# बँक ऑफ इंडियामध्ये हिंदी मास उत्साहात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ इंडियाच्या नवी मुंबई शाखेत १४ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबरदरम्यान हिंदी माह साजरा करण्याात आला. या दरम्यान कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाजामध्ये हिंदी भाषेचा वापर केला. हिंदी माहचा समारोप कार्यक्रम शुक्रवारी (दि. १४) करण्यात आला.




या वेळी विभागीय अध्यक्ष अनिल जाधव यांनी गृहमंत्री अमित शाह, बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ए. के. दास यांच्या संदेशांचे वाचन केले. कार्यालयीन कामकाजात जास्तीत जास्त हिंदी भाषेचा वापर करण्याची प्रतिज्ञा विभागीय अध्यक्ष अनिल जाधव व सर्व कर्मचाऱ्यांनी घेतली. यादरम्यान हिंदी टंक लेखन, बँकिंग शब्दावली, भाषण स्पर्धा, ई-मेल स्पर्धा, निबंध, गीत गायन स्पर्धा आणि ऑनलाइन बैंकिंग व राजभाषा ज्ञान स्पर्धा घेण्य्ात आल्या. विजेत्यांना पुरस्कार आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.


**E-TENDER NOTICE**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. | Description | Estimated Cost in Lakhs |
|---|---|---|---|
| 1 | SE/EHV/(O&M)/CIR/ PNL/e-Tender-45/2022-2023 RFx No.: **7000024994** | Procurement of 0.4 ACSR Zebra & 0.2 ACSR Panther Conductor for EHV(O&M) Circle, Panvel. | Rs. 23.26 Lakhs |

**EMD:** 1% of Estimated Cost **Tender Fee:** Rs. 500/- + GST **Submission of Bids:** From 18.10.2022 to 25.10.2022 up to 23.59 hrs, **Bid Opening Date and Time:** 25.10.2022 at 11:00 Hrs (Technical) and at 15.00 Hrs (Commercial) if possible. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624/25 **Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## पंतप्रधान गतिशक्ती मल्टीमोडल मेरीटाईम रिजनल समिट
# लॉजिस्टिकसंदर्भात जेएनपीएचा पुढाकार

**उरण : वार्ताहर**

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) व मुंबई बंदर प्राधिकरण (एमबीपीए) यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान गति शक्ती मल्टीमॉडेल मेरीटाईम रिजनल समिट २०२२ आयोजित करण्यात आली आहे. त्याचे उद्घाटन रविवारी (दि. १७) बंदरे आणि खाणविकास मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते झाले.




पंतप्रधानांनी ऑक्टोबर २०२१मध्ये सुरू केलेल्या मल्टीमॉडेल कनेक्टिव्हिटीसाठी गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन या संकल्पनेबद्दल अधिक जागरुकता निर्माण करणे हा या परिषदेमागचा उद्देश आहे. या वेळी आयएएस जेएनपीए अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, आयएएस एमबीपीए अध्यक्ष राजीव जलोटा, उपाध्यक्ष आदेश तितरमारे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

दादाजी भुसे यांनी आपल्या भाषणात, पंतप्रधान गती शक्ती योजना, एक पायाभूत सुविधा बदलणारी योजना, भारताला २०४०पर्यंत २० ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्याचे स्वप्न पूर्ण साकारण्यास मदत करण्यासाठी सुरू करण्यात आली होती. सर्व संबंधित केंद्रीय मंत्रालये, विभाग आणि राज्य सरकारांमध्ये एकात्मिक पायाभूत सुविधा नियोजन आणि समक्रमित प्रकल्प अंमलबजावणीसाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. पंतप्रधान गति शक्ती योजनेमुळे राज्य रस्ते, बंदर आणि विमानतळ कनेक्टिव्हिटीचे केंद्र म्हणून उदयास येऊ शकतील आणि राज्यातील व्यापार आणि आर्थिक समृद्धी वाढेल, असा विश्वास व्यक्त केला.

संजय सेठी यांनी, गती शक्ती संसाधनांची देवाण-घेवाण करून आणि अधिक सामंजस्यपूर्ण इकोसिस्टिम तयार करण्याच्या दिशेने समन्वय विकसित करून पायाभूत सुविधांच्या पाइपलाइनला अधिक शक्ती आणि गती देईल, असे सांगून जेएनपीएची मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी पीएम गति शक्तीच्या धर्तीवर खूप मोठे योगदान देते असे नमूद केले. राजीव जलोटा म्हणाले, पंतप्रधान गति शक्ती सहा स्तंभांवर आधारित आहे. सर्वसमावेशकता, प्राधान्यक्रम, ऑप्टिमायझेशन, सिंक्रोनायझेशन, विश्लेषणात्मक आणि गतिमान. गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन पायाभूत सुविधा आणि आर्थिक मंत्रालयांसाठी एक वास्तविक वेळ निर्णय घेण्याचे साधन बनेल.

या समिटमध्ये विभागांमध्ये समन्वय निर्माण करणे, ब्रेकिंग द सायलोस, ऑप्टिमायझेशनसाठी तंत्रज्ञानाचा वापर, वेळ आणि खर्च कमी करणे, डेटा मॅनेजमेंट एनालिटिक्स अँड युटिलायझेशन, गतीशक्तीचे कन्व्हर्जिंग अमृत काल व्हिजन २०४७ आणि गतीशक्ती उपक्रमांचे परिणाम व आउटपुट यांसारख्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

(छाया : संकेत भोईर)





**पनवेल : भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पनवेल मंडल सोशल मीडिया सेल सहसंयोजक तथा अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस चेतन कांबळे आणि राजे प्रतिष्ठान कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष बशीर कुरेशी यांना वाढदिवसानिमित्त सोमवारी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, निलेश पाटील, माजी नगरसेविका नीता माळी, राजेश पाटील, सुकापूरचे उपसरपंच दिवेश भगत, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, वपोनि सुभाष कोकाटे उपस्थित होते.**

(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : वलप येथील प्रतिक नागा पाटील यांनी नवीन घर बांधले आहे. त्यानिमित्त वास्तूशांती पूजा सोमवारी आयोजित केली होती. या पुजेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत प्रतिक पाटील यांना शुभेच्छा दिल्या.**



## कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या माध्यमातून
# 'दीपक नायट्रेड'च्या कामगारांसाठी पगारवाढीचा करार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा एमआयडीसी क्षेत्रातील दीपक नायट्रेड लिमिटेडमधील कामगारांना वेतनवाढ आणि सेवा सुविधांचा करार दीपक नायट्रेड एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. त्यानुसार कामगारांना प्रती महिना १३,५०० रुपयांची पगारवाढ झाली आहे.



**दरमहा १३,५०० रुपयांची वेतनवाढ**

चार वर्षांसाठी झालेल्या करारानुसार पगारवाढीसोबत २० टक्के बोनस, तीन लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलिसी, १५,२०० सानुग्रह अनुदान व इतर सेवा कामगारांना देण्यात येणार आहेत. या करारावर स्वाक्षरी करताना युनियनचे अध्यक्ष जितेंद्र घरत, जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या कार्यालयीन सचिव समीरा चव्हाण, सचिव विनायक मुंबईकर, संघटक रवींद्र कोरडे, कंपनीतर्फे जनरल मॅनेजर राजेश पालकर, एम. गणेसन, भरत सकपाले, साईट हेड अविनाश परांजपे, उपव्यवस्थापक हर्षल पाटील, कामगार प्रतिनिधी राजेंद्र तारेकर, सुरेश म्हात्रे, शिवराम म्हात्रे, प्रकाश एडगे, गणेश पाटील आदी उपस्थित होते.

# कामोठ्यात सोसायटीच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन
## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले मार्गदर्शन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

सेक्टर ३५ येथील महावीर व्हिला को. ऑप. हौसिंग सोसायटीचे नवीन कार्यालयाचे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. १६) उद्घाटन झाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी हौसिंग सोसायटीसाठी असलेल्या कायद्याचे ज्ञान करून घेणे उपयुक्त ठरेल, असा सल्ला पदाधिकारी आणि रहिवाशांना दिला. या वेळी महापालिकेच्या माजी नगरसेविका हेमलता गोवारी, भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष रवि जोशी, समाजसेवक रवि गोवारी, युवा नेते जयकुमार डिगोळे, सोसायटीचे अध्यक्ष बाबू पोटले, सचिव प्रवीण गमरे, खजिनदार तुषार वारखडे, सुशांत नायर, लक्ष्मण पाटील, स्वप्नील खैरनार, स्वप्नील दळवी, स्वप्नील दळवी, सुकेश राव, रघुनाथ तनपुरे, भावना दांडेकर, रमेश यादव आदी उपस्थित होते.



# सोहम फाउंडेशनच्या वतीने बालविवाहमुक्त भारत अभियान




**पनवेल, उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

बालविवाहमुक्त भारत अभियानाची सुरुवात वडघर येथे रविवारी (दि. १७) सोहम फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आली.

पनवेल आणि रायगड जिल्हयातील ग्रामीण भागात सोहम फाउंडेशनच्या वतीने जनजागृती अभियान राबविले जात आहे. नवी दिल्ली येथील चिल्ड्रन फाउंडेशन आणि महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट, पेण यांच्या सहकार्याने रायगड जिल्ह्यात अभियान सुरू आहे. बालविवाह राज्यात कमी व्हावेत, यासाठी हे अभियान राबविले जात आहे.

सोहम फाउंडेशनच्या वतीने अध्यक्षा मंजिरी मुळे, सचिव अ‍ॅड. आश्लेषा मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्र संयोजक शितल म्हात्रे काम पाहत आहेत. या अभियानाला ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे.

# ऑर्चिड फर्टिलिटी क्लिनिकमध्ये अद्ययावत उपचार उपलब्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील मिरची गल्ली परिसरातील ऑर्चिड फर्टिलिटी क्लिनिकमध्ये डॉ. सिद्धी संतोष कामेरकर यांच्यामार्फत अद्ययावत उपचार उपलब्ध देण्यात आले आहेत.

यामध्ये फर्टिलिटी स्पेशालिस्ट, आयव्हीएफ स्पेशालिस्ट, प्रसुतीतज्ज्ञ व स्त्रीरोगतज्ज्ञांमार्फत उपचार केले जातात. विवाहानंतर ज्या जोडप्यांना काही समस्यांमुळे संततीप्राप्त होत नाही त्यांना व वंधत्व निवारणासाठी उपचार पद्धती उपलब्ध करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे प्रसुतीतज्ज्ञांकडून स्त्रीयांच्या गर्भधारणेदरम्यान व बाळाच्या जन्मानंतर घ्यावयाची काळजी, तपासण्या याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात येईल. त्याचप्रमाणे स्त्रीरोग तज्ज्ञांकडून पीसीओडी, मासिकपाळीतील अनियमितता, अंडाशयातील गाठींचे आजार, गर्भाशयाचे आजार व त्यावरील उपचार याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात येईल. अधिक माहितीसाठी (८५५२८८९२८१/९९६७२६५८७८) या क्रमांकावर डॉ. सिद्धी संतोष कामेरकर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये कचरा वर्गीकरण जनजागृती कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अभियानांतर्गत कचरा वर्गीकरण जनजागृती कार्यक्रम सोमवारी (दि. १७) प्रभाग क्रमांक १७ शिवाजी नगर वसाहत येथे घेण्यात आला.

या कार्यक्रमाला आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, प्रभाग क्रमांक १७चे स्वच्छता निरीक्षक अनिकेत जाधव, स्वच्छता निरीक्षक अभिजित भवर, पर्यवेक्षक रमेश गरुडे, नंदू जाधव, संदिप जाधव, उत्तम चिखलेकर, जयराम भोईर, असलम शेख, नितीन ठाकूर, संतोष नागमोडे, भाजप उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष रावसाहेब खरात, ज्येष्ठ कार्यकर्ते संजय जाधव, किशोर वाहुळकर, आनंद जाधव, दिपक खरात, विकी प्रजापती, सुचित दासरी, संजय वाणी, अब्दुल बागवान, राम येडे, रामू झिरे, गोरख खवले आणि शिवाजी नगर वसाहत महिला, आशावर्कर ज्योती राहुल वाहुळकर, छाया जाधव, चंद्रभागा येडे, साधना वळंजू, स्वाती पांडव, सीमा प्रजापती, सुमन धोत्रे, ताराबाई खवले, अनुसया वाहुळकर, सविता खवले, नूरजहाँ बागवान उपस्थित होते.

## गव्हाण विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ज्ञानात पडणार अधिक भर
# दिवाळी अभ्यासासाठी 'अगस्त्य'तर्फे कृतीपुस्तिका

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना पनवेल येथील अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशनच्या सायन्स केंद्रातर्फे दिवाळी सुट्टीतील अभ्यासासाठी अहल सेरीजमधील अ‍ॅक्टी लर्न १.० या कृतीपुस्तकांचे वितरण करण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जाणीवा अधिक रुंदावण्यासाठी दिवाळीच्या सुट्टीत हसत-खेळत आणि मनोरंजनात्मक पद्धतीने प्रात्यक्षिकांसह पुस्तकांमधील कृतींचा उपयोग करून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांची गोडी निर्माण होऊन विद्यार्थी अधिक प्रयोगशील होतील, या उद्देशाने या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे.

डू, थिंक, क्वेश्चन (कृती, विचार, प्रश्न) आधारित या पुस्तकाची रचना करण्यात आली असून यामध्ये एकूण ४४पेक्षा जास्त प्रयोग विद्यार्थी करू शकतील, अशा प्रकारचा व्होरा पुस्तककर्त्यांकडून व्यक्त करण्यात आला आहे. विज्ञानाच्या अनेक संकल्पना स्वतःच्या हाताने कृती करण्यासाठी गोष्टीरूप पद्धतीने सांगून त्यांच्यात कृतीयुक्त शिक्षण तसेच सवंगड्यांकडून आदान-प्रदान करणे यांसारखे महत्त्वाचे गुण अंगी बाळगण्यास मदत करण्यासाठी ह्या कृतिपुस्तकाचा उपयोग होईल. विद्यालयातील ७२२हून अधिक विद्यार्थ्यांना अ‍ॅक्टि लर्न १.० पुस्तकांचे वितरण करण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी दिली.

या वेळी विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे, ज्येष्ठ अध्यापिका आणि संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, उपशिक्षक सागर रंधवे, प्रसन्न ठाकूर आदी उपस्थित होते.

## 'बीपीसीएल'विरोधात
# प्रकल्पग्रस्ताचे आमरण उपोषण

**उरण : प्रतिनिधी**

बीपीसीएल राष्ट्रीय प्रकल्प भेंडखळ येथे कार्यरत असून येथील ग्रामस्थांनी आपल्या पिकत्या जमिनी कवडीमोल भावाने बीपीसीएल प्रकल्पाला दिल्या. शेतजमिनीच्या बदल्यात शेतकऱ्यांना नोकरी देण्याचे आश्वासनही कंपनी प्रशासनाने शेतकऱ्यांना दिले होते, मात्र भेंडखळ येथील प्रकल्पग्रस्त अविनाश रमण ठाकूर यांना ३० ते ३५ वर्षे झाले तरीही नोकरीत सामावून घेण्यात आलेले नाही. त्यामुळे अविनाश ठाकूर यांनी कंपनी गेटसमोरच रविवार (दि. १७)पासून आमरण उपोषण सुरू केले आहे.



या उपोषणाला भेंडखळ ग्रामस्थ मंडळ, भारतीय जनता पक्षाचे मिलींद पाटील, भारतमुक्ती मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष ज्ञानोबा सूर्यवंशी, बहुजन क्रांती मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष मनोज रामधरणे, राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष धर्मपाल जाधव, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष जंगबहादुर चौधरी, बहुजन मुक्ती पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष प्रविण पाटील, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे उरण तालुका उपाध्यक्ष शिवाजी ठाकूर, छत्रपती क्रांती सेनाचे रायगड जिल्हाध्यक्ष श्रेयश म्हसकर, वारकरी संप्रदायाचे प्रभाकर ठाकूर आदी विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.

## संपादकीय

# परंपरेचा सन्मान

भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांनी आपापसात चर्चा करून अंधेरी पोटनिवडणुकीतील आपला उमेदवार मागे घेत असल्याचे सोमवारी जाहीर केले. भाजपने केलेला हा त्याग त्या पक्षाची प्रगल्भता अधोरेखित करणारा आहे. राजकारणात डावपेच सर्वच पक्ष लढत असतात. त्यात नवे असे काही नाही, परंतु ते लढवताना सभ्यपणाची मर्यादा ओलांडली जाता कामा नये याची दक्षता भाजपचे ज्येष्ठ नेते नेहमीच घेत असतात.

**शिवसेनेत मोठी फूट पडल्यानंतर महाराष्ट्रात जे महासत्तांतर घडून आले, त्याचे हादरे अद्यापही बसत आहेत असे दिसते. या सत्तांतरानंतरच मुंबईच्या पश्चिम उपनगरातील अंधेरी पूर्व येथे होऊ घातलेल्या पोटनिवडणुकीकडे साऱ्यांचे लक्ष लागले होते. येथील निकाल हा सत्तांतराला जनता काय कौल देते याची झलक असेल असे राजकीय पंडित मानत होते. त्यातही ही निवडणूक शिवसेनेचा पारंपरिक बालेकिल्ला असलेल्या मुंबईत होत होती आणि सामना रंगणार होता तो उद्धव ठाकरे विरुद्ध भारतीय जनता पक्ष असा. या दोन्ही पक्षांबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी ही निवडणूक तितकीच महत्त्वाची होती. तथापि, गेल्या २४ तासांत वेगाने राजकीय उलथापालथी होऊन त्याचे पर्यवसान अखेर भाजपचे अधिकृत उमेदवार मुरजी पटेल यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्यात झाले. आता अंधेरी पूर्व येथील पोटनिवडणूक जवळपास बिनविरोध झाल्यात जमा आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार ऋतुजा लटके यांचा विधानसभेत जाण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. दिवंगत शिवसेना आमदार रमेश लटके यांच्या निधनानंतर ही पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. लोकप्रतिनिधीच्या निधनानंतर होणाऱ्या पोटनिवडणुकीत त्या प्रतिनिधीचा आप्त उभा राहणार असेल तर ती निवडणूक अन्य पक्षांनी लढवू नये अशी परंपरा महाराष्ट्रात चालत आली आहे. अर्थात, हा काही नियम नव्हे. असे केल्याने दिवंगत लोकप्रतिनिधीला ती एक प्रकारची श्रद्धांजलीच ठरते असे मानण्याचा हा एक संकेत आहे. अशाच आशयाचे पत्र महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवले. पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनीदेखील निवडणूक बिनविरोध व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर भाजपने आपला उमेदवार मागे घेत असल्याचे जाहीर केले. भाजप उमेदवाराच्या या माघारीनाट्यामागे काही वेगळे डावपेच तर लढले गेले नाहीत ना अशी शंका काही जण व्यक्त करीत आहेत. किंबहुना, राज ठाकरे यांनी पत्र लिहिणे आणि त्यानंतर भाजपने उमेदवारी मागे घेणे हे ठरवलेले स्क्रिप्ट असल्याची टीका शिवसेना उद्धव गटाचे नेते व सध्या कारागृहात गजाआड मुक्काम असलेले खासदार संजय राऊत यांनी कोर्टाच्या बाहेर व्यक्त केली. असले उद्योग करण्याची त्यांना कायद्याने परवानगी आहे का हा चर्चेचा मुद्दा आहे, परंतु राज ठाकरे यांचे पत्र जर राजकीय स्क्रिप्ट असेल, तर शरद पवार यांची मागणी हीसुद्धा स्क्रिप्टचा भाग मानायची का असा प्रश्न निर्माण होतो. आपला उमेदवार मागे घेऊन भाजपने दिवंगत लोकप्रतिनिधीचा सन्मान राखला आणि महाराष्ट्रातील एका उदात्त राजकीय परंपरेचे पालन केले. त्याचे खुल्या मनाने स्वागत केले पाहिजे. निवडणूक टळल्यामुळे आपण नेमके कुठे आहोत हे मात्र उद्धव ठाकरे गटाला आता कळू शकणार नाही ही बाब विचारात घेण्याजोगी आहे.**

# बालविवाहमुक्त भारत अभियान



बालविवाहाचे सामाजिक भयंकर परिणाम आपल्या समाजात फार पूर्वीपासून आहेत. सर्व प्रयत्न करूनही यावर नियंत्रण मिळवता आलेले नाही. आता तो समूळ नष्ट करण्यासाठी उपक्रम राबविण्यात येत आहे. जगातील ज्या देशांमध्ये बालविवाहाची प्रथा प्रचलित आहे त्या देशांमध्ये भारताचा पहिला क्रमांक लागतो. एका अंदाजानुसार आपल्या देशातील २० ते २४ वयोगटातील २३.३ टक्के महिला अशा आहेत, ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण होण्याआधीच लग्न झालेले आहे.

बालविवाह हा मुलांवरील गुन्ह्यांचा सर्वात क्रूर चेहरा आहे, जो त्यांच्या मानवी हक्कांचे पूर्णपणे उल्लंघन करतो. अल्पवयीन मुलींना बालवधू बनण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे त्यांना मानसिक छळ, शारीरिक त्रास सहन करावा लागत असून शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. बालविवाहामुळे मुलींना लहान वयातच मातांची जबाबदारी पार पाडावी लागते आणि काही वेळा या अल्पवयीन मुलांचाही प्रसूतीदरम्यान मृत्यू होतो.

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या (डब्ल्यूएचओ) मते अल्पवयीन मुलींना संसर्गजन्य लैंगिक रोगांचा धोका जास्त असतो. म्हणून जेव्हा त्यांचे लहान वयात लग्न होते तेव्हा त्या शरीरातील रक्त कमी होण्याच्या बळी ठरतात. गरीब आणि असुरक्षित कुटुंबातील मुलींची लग्नासाठी खरेदी-विक्री केली जाते. त्यांची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी तस्करी केली जाते. काहीवेळा त्यांनी एकापेक्षा जास्त पुरुषांशी लग्न केले आहे. यानंतर तिचा नवरा तिला रेडलाइट एरियात वेश्याव्यवसायासाठी विकतो. बालविवाहाची ही वाईट गोष्ट केवळ काही समाज किंवा किरकोळ भागांपुरती मर्यादित नाही, तर काही धर्मांमध्येही ती प्रचलित आहे, जिथे मुलींचे लग्न वयात आल्यावरच केले जाते, कायदेशीररित्या लग्न करण्यासाठी त्यांचे वय काहीही असो. येथे चिंतेची बाब अशी आहे की अलीकडील काही न्यायालयीन निकालांनी विवाहाला धर्माचा एक भाग म्हटले आहे, जे भारतीय कायद्याच्या विरुद्ध आहे.

रायगड जिल्ह्यातील महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट पेण आणि सोहम फाऊंडेशन पनवेल यांनी जनजागृती अभियान नवी दिल्लीतील चिल्ड्रन फाऊंडेशनच्या वतीने आयोजित केले आहे. नोबेल शांतता पारितोषिक विजेते, प्रख्यात बाल हक्क कार्यकर्ते आणि समाजसुधारक कैलाश सत्यार्थी यांनी भूतकाळात मुलांच्या भविष्यावर परिणाम करणाऱ्या मुद्द्यांवर अनेक मोर्चे आणि मोहिमा काढल्या आहेत. या प्रयत्नांचा परिणाम म्हणून मुलांविरुद्धच्या गुन्ह्यांचा सामना करण्याच्या वेन्सीच्या दृष्टिकोनात सुधारणा झाली आहे. भूतकाळात मुलांच्या भविष्यावर परिणाम करणाऱ्या मुद्द्यांवर अनेक मोर्चे आणि मोहिमा काढल्या आहेत. या प्रयत्नांमुळे मुलांविरुद्धच्या गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी आमच्या कायदेशीर प्रक्रिया आणि सुरक्षा एजन्सीच्या दृष्टिकोनात सकारात्मक आणि प्रगतीशील बदल झाला आहे. या मोहिमेमुळे पीडितांना न्याय मिळेल याची खात्रीही झाली आहे. १९९८मध्ये कैलाश सत्यार्थी यांनी बालकामगारांच्या विरोधात जागतिक मार्च (ग्लोबल मार्च अगेन्स्ट चाइल्ड लेबर) काढला.

१०३ देशांतून निघालेल्या या मोर्चात सात दशलक्ष लोकांनी सहभाग घेतला आणि बालमजुरी निर्मूलनासाठी पाठिंबा व्यक्त केला. या मोर्चाने बालमजुरीविरुद्ध प्रचंड जागतिक वातावरण निर्माण केले. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनाच्या (आयएलओ) अधिवेशनादरम्यान १९९८मध्ये मार्च स्वतःच संपला आणि गरीब परिस्थितीत काम करणार्या बालकामगारांचा आवाजदेखील आयएलओ कन्व्हेन्शन १८२च्या मसुद्यात प्रतिबिंबित झाला. आयएलओ अधिवेशन १८२ २०२०मध्ये जागतिक स्तरावर स्वीकारण्यात आले. आयएलओच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या वेगाने आणि जागतिक पातळीवर अधिवेशन स्वीकारले गेले. ग्लोबल मार्च, त्याचे सदस्य आणि सहयोगींनी यात महत्त्वाची भूमिका बजावली. सध्याच्या काळात बालविवाहाविरुद्ध आवाज उठवणे आवश्यक आहे कारण आजही समाजातील अनेक घटकांमध्ये बालविवाहाकडे मुलांवरील क्रूर गुन्हा म्हणून न पाहता परंपरा म्हणून पाहिले जाते.


स्वामी दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी श्रद्धानंद यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी बालविवाहाच्या या सामाजिक दुष्प्रवृत्तीविरुद्ध दीर्घकाळ लढा दिला आहे. त्यांच्या सामाजिक चळवळीचे फलित म्हणजे बालविवाह प्रतिबंधक कायद्याने १९२९मध्ये कायद्याचे रूप धारण केले, त्याला 'शारदा कायदा' असेही नाव पडले. आपल्या देशातील बालविवाहाविरुद्धचा हा पहिला कागदोपत्री कायदा होता. पुढे सरकारने बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ या कायद्याला आकार दिला. देशातून बालविवाह पूर्णपणे नष्ट करणे हे त्याचे ध्येय होते. मात्र, हे उद्दिष्ट अजून गाठायचे आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (आयएमएफ) मते आज एकीकडे भारताची अर्थव्यवस्था २०३०च्या अखेरीस जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या उंबरठ्यावर आहे, तर दुसरीकडे दुर्दैवाने बालविवाहासारखी सामाजिक दुष्कृत्ये अजूनही कायम आहेत. आपल्या समाजात त्यांचे स्थान आहे. मुलींच्या सुरक्षिततेची काळजी पालकांनाही बालविवाह करण्यास भाग पाडते. ही एक गंभीर समस्या आहे. गरीब आणि शोषित वर्गातील मुलींना वयाच्या १४ वर्षांनंतर शिक्षण ठेवणे कठीण आहे. अशा परिस्थितीत त्यांना बळजबरीने बालविवाहाच्या खाईत ढकलले जाते. आपल्या समाजाचा विकास करून, आपल्याला देशातील महिलांसाठी एक मजबूत अर्थव्यवस्था बनवायची आहे, जेणेकरून त्या देशाच्या प्रगतीत आपली भूमिका बजावू शकतील.

सन २०१७मध्ये नोबेल शांतता पारितोषिक विजेते कैलाश सत्यार्थी यांच्या नेतृत्वाखाली कैलाश सत्यार्थी चिल्ड्रन फाऊंडेशनने (केएसीएफ) बाल लैंगिक शोषणाविरुद्ध देशव्यापी 'भारत यात्रा' काढली. बाल लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्यांना कालबद्ध न्याय मिळवून देणे, अशा गुन्ह्यांना आळा घालणे आणि त्यासाठी आवश्यक कायदेशीर व धोरणात्मक बदल करणे हा या भेटीचा उद्देश होता. 'मेक इंडिया सेफ फॉर चिल्ड्रेन' या संदेशासह ही यात्रा एक सामाजिक चळवळ होती, ज्यामध्ये स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक स्तरावर कार्यक्रम आयोजित केले गेले. संरक्षण आणि काळजी आवश्यक असलेल्या मुलांसाठी जागतिक समर्थन एकत्रित करणे हे त्याचे ध्येय होते. (भारताच्या भेटीमुळे भारतीय दंड संहितेत सुधारणा करण्यात आली. गुन्हेगारी कायदा (सुधारणा) अध्यादेश, २०१८ मध्ये बाल बलात्कारात सर्वाधिक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. कालबद्ध न्यायासोबतच पोक्सो कायद्यातही योग्य त्या सुधारणा करण्यात आल्या- २०१२.)

कैलाश सत्यार्थी यांनी स्थापन केलेली कैलाश सत्यार्थी चिल्ड्रन्स फाऊंडेशन (केएसीएफ) 'बालविवाहमुक्त भारत' ही देशव्यापी मोहीम सुरू झाली आहे. तीन वर्षे चालणारे हे अभियान पाच हजार गावांपर्यंत पोहोचणार आहे. सामाजिक दुष्टींविरुद्ध जनजागृती करण्याच्या मोहिमेंतर्गत एक कोटीहून अधिक लोक जोडले जातील. सन २०२५पर्यंत बालविवाहांची संख्या १० टक्क्यांनी कमी करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे, जे सध्या २३.३ टक्के आहे. बालविवाहामुळे तरुण मुलींच्या सर्व अधिकारांचे, विशेषत: त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षिततेचे उल्लंघन होते. बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ला इतर कायद्यांपेक्षा प्राधान्य दिले पाहिजे. तसेच बालविवाहाला मानवी तस्करीपासून वेगळे पाहिले जाऊ नये. याशिवाय केएससीएफ च्या प्रमुख कार्यक्रमांपैकी एक असलेल्या बाल मित्र ग्राम (बाल मित्र ग्राम) आणि Survivor-Led Intelligenceद्वारे खेड्यांमध्ये बालविवाहाविरुद्ध जनजागृती मोहीम अनेक वर्षांपासून सातत्याने चालवली जात आहे. रायगड जिल्ह्यातील जनतेने उत्स्फूर्तपणे या मोहिमेमध्ये सहभागी व्हावे असे, आवाहन करण्यात येत आहे.

**-आश्लेशा गणेश मुळे**
**(सचिव, सोहम फाऊंडेशन, पनवेल)**



## बदलते तंत्रज्ञान

# असे करा पॅन कार्ड आधार कार्डशी लिंक




पॅन कार्ड आधार कार्डशी लिंक करण्यात यावे असा नियम सरकारने जाहीर केला आहे. या नियमानुसार पॅन कार्ड आधार कार्डशी लिंक केले नाही तर बँकेच्या व्यवहारांमध्ये अडचणी येऊ शकतात. त्यामुळे सर्वांना पॅन कार्ड आधार कार्डशी लिंक करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जर तुम्हाला यासाठी वेळ काढणे कठीण असेल, तर घरबसल्या ऑनलाईन प्रक्रियेद्वारे तुम्ही पॅन कार्ड आधार कार्डशी लिंक करू शकता.

पॅन कार्ड आणि आधार कार्ड भारतीयांसाठी हे दोन महत्त्वाचे डॉक्युमेंट्स आहेत. कोणत्याही सरकारी कामासाठी हे दोन डॉक्युमेंट्स आवश्यक असतात तसेच आधार कार्ड आणि पॅन कार्डमुळे अनेक सरकारी योजनांचा लाभ घेता येतो. बँकेच्या किंवा कोणत्याही आर्थिक व्यवहारासाठी पॅन कार्डची गरज भासते. पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंक केल्याने इनकम टॅक्स रिटर्नची प्रक्रिया करणे शक्य होते. त्यामुळे जर तुमचे पॅन कार्ड आधार कार्डशी लिंक नसेल तर शेवटच्या तारखेच्या आधी ते लिंक करणे आवश्यक आहे.

**पुढील स्टेप्स वापरून ऑनलाईन**
**पॅन कार्ड आधार कार्डशी लिंक करा**

https://incometaxindiaefiling.gov.in/ही आयकर विभागाची अधिकृत वेबसाईट उघडा.

त्यावर रेजिस्टर केले नसेल तर आधी रेजिस्टर करा. तुमचा पॅन कार्ड नंबर इथे युजर आयडी असेल.

पासवर्ड, युजर आयडी आणि जन्मतारीख टाकून लॉग इन करा.

तिथे तुम्हाला 'लिंक आधार' (Link -adhar) हा पर्याय दिसेल. जर हा पर्याय दिसत नसेल तर मेन्यु प्रोफाइल सेटींग्स लिंक आधार या स्टेप्स वापरा.

त्यानंतर पॅन कार्डवरून लॉग इन केल्यामुळे तुमची जन्मतारीख, लिंग ही माहिती आपोआप भरली जाईल.

त्यांनंतर आधार कार्ड आणि पॅन कार्डचे डिटेल्स तिथे भरा.

जर हे डिटेल्स मॅच झाले तर 'लिंक नाऊ' हा पर्याय दिसेल तो निवडा.

यानंतर एका मेसेजद्वारे तुम्हाला आधार आणि पॅन लिंक झाले असल्याचे सांगण्यात येईल. अशाप्रकारे ऑनलाईन प्रक्रियेद्वारे तुम्ही पॅन कार्ड आधार कार्डशी लिंक करू शकता.

# थोर ज्ञानोपासक चिंतामण वैद्य

चिंतामण विनायक वैद्य एक थोर ज्ञानोपासक, महाभारत-रामायणाचे संशोधक-मीमांसक व चतुरस्र ग्रंथकार होते. त्यांचा जन्म १८ ऑक्टोबर १८६१ रोजी कल्याण (जिल्हा ठाणे) येथे झाला. त्यांचे वडील विनायकराव कल्याणला वकिली करीत. चिंतामणरावांचे शिक्षण कल्याण तसेच मुंबईच्या एल्फिन्स्टन स्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजात झाले. एमए (१८८२) आणि एलएलबी (१८८४) झाल्यानंतर त्यांनी काही काळ कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ येथे मुनसफ म्हणून व नंतर ठाण्याच्या कोर्टात वकील म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर उज्जैन येथे न्यायाधीश पदावर ते रुजू झाले. पुढे ग्वाल्हेर संस्थानच्या सरन्यायाधीशपदी त्यांची नियुक्ती झाली (१८९५-१९०४).

सेवानिवृत्तीनंतर चिंतामण वैद्य हे १९०५ सालापासून लोकमान्य टिळकांचे सहकारी म्हणून कार्य करू लागले. राष्ट्रीय शिक्षणाचे काम त्यांनी आस्थेने व निष्ठेने केले. कोलकाता, सुरत आदी अधिवेशनांना ते टिळकांबरोबर गेले. टिळकांच्या पश्चात त्यांनी महात्मा गांधीजींचा मार्ग अनुसरला. वेगवेगळ्या समित्यांवर काम करणे, अहवाल लिहिणे ही कामे त्यांनी गांधींच्या मार्गदर्शनाखाली केली. पुढे चिंतामणरावांनी राजकारण सोडले.



वैद्यांनी १८८९ ते १९३४ या काळात विपुल लेखन (सुमारे ५० हजार पृष्ठांचे) केले. त्यांचे स्फुटलेखन केसरी, विविधज्ञानविस्तार, इंदुप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन आदी नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. यांपैकी थोडेच लेखन ग्रंथरूपाने संगहित झाले. इंग्रजी (९) व मराठी (२०) अशा त्यांच्या एकूण प्रकाशित ग्रंथांची संख्या २९ आहे. त्यांपैकी काही उल्लेखनीय ग्रंथ असे : महाभारत एक क्रिटिसिझम (१९०४), संक्षिप्त महाभारत (१९०५), रिडल ऑफ रामायण (१९०६), अबलोन्नतिलेखमाला (१९०६), एपिक इंडिया (१९०७), मानवधर्मसार-संक्षिप्त मनुस्मृति (१९०९), दुर्दैवी रंगू (१९१४), श्रीकृष्ण चरित्र (१९१६), महाभारताचा उपसंहार (१९१८), हिस्टरी ऑख मिडिव्हल हिंदु इंडिया ( ३ खंड, १९२१, १९२४ व १९२६), संस्कृत वाङ्मयाचा त्रोटक इतिहास (१९२२), मध्ययुगीन भारत (तीन खंड, १९२५), गझनीच्या महमूदाच्या स्वाऱ्या (१९२६), ए हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर (१९२६), वैद्यांचे ऐतिहासिक निबंध (१९३१), शिवाजी द फाउंडर ऑफ मराठा स्वराज (१९३१), हिंदू धर्माची तत्त्वे (१९३१), महाभारताचे खंड - सभापर्व, विराटपर्व, उद्योगपर्व (१९३३-३५), संयोगिता नाटक (१९३४).

या ग्रंथांपैकी महाभारत ए क्रिटिसिझम यावर लोकमान्यांनी केसरीतून सलग आठ अग्रलेख लिहून परीक्षण केले व ग्रंथांची मौलिकता दाखविली. त्यानंतर टिळकांनी रिडल ऑफ रामायण या ग्रंथाचे आणखी एक अग्रलेख लिहून परीक्षण केले. रामायण व महाभारत ही कल्पित काव्ये नसून ते इतिहासाचे ग्रंथ आहेत, या आपल्या विश्वासाला वैद्यांकडून व्यासंगपूर्ण समप्रमाण पुष्टी मिळाल्याबद्दल लोकमान्यांनी आपल्या अग्रलेखात (६ जुलै १९०६) समाधान व्यक्त केले आहे. वैद्यांनी एपिक इंडिया व श्रीकृष्ट चरित्र हे ग्रंथ महाभारताच्या संदर्भात लिहिले. महाभारताचा तर्कशुद्ध सखोल प्रगाढ अभ्यास त्यातून जाणवतो. महाभारताची सर्वंकष मीमांसा करणारा आद्य भाष्यकार म्हणून लोकमान्यांनी वैद्यांना 'भारताचार्य' ही पदवी दिली.

महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक-सांस्कृतिक संस्थांशी वैद्य यांचा घनिष्ठ संबंध होता. पुणे येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते (१९०८). कल्याण येथे २० एप्रिल १९३८ रोजी त्यांचे निधन झाले.

## क्लिक...क्लिक...!



उरण : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने शहरात रविवारी पथसंचलन करण्यात आले. (छाया : दिनेश पवार)

## आरोग्य प्रहर

# हार्ट ब्लॉकेजवर काही नैसर्गिक उपाय

हार्ट ब्लॉकेज झाल्यावर हृदयाचं इलेक्ट्रिक सिस्टम प्रभावित होतं. ही समस्या कोरोनरी आर्टी डिजीजपेक्षा वेगळी आहे. ज्यात हृदयाच्या रक्त वाहिन्यांवर प्रभाव पडतो. जेव्हा हार्ट ब्लॉकेज होतं तेव्हा हृदयाचे ठोके अनियमित होतात आणि सामान्यापेक्षा हळू गतीने हृदय काम करतं. हृदयाचे ठोके एकावेळी २० सेकंद उशिराने होतात.



हृदयाचे ठोके कमजोर होणे किंवा अनियमित होणे, तसेच घाबरल्यासारखं वाटणे, श्वास घेण्यास समस्या होणे, डोक्यात चक्कर येणे, छातीत वेदना आणि अस्वस्थ वाटणे, शरीरार व्यवस्थित रक्त पुरवठा होत नसल्याने एक्सरसाइज करण्यात अडचण येणे ही हार्ट ब्लॉकेजची लक्षणे आहेत.

अनेक रिसर्चमधून समोर आलं आहे की, रोज एक कप डाळिंबाचं ज्यूस सेवन केल्याने रक्त शुद्ध होतं, रक्तप्रवाह सुरळित राहतो आणि ब्लड प्रेशरही नियंत्रणात राहतं. तसेच कोरोनरी आर्टरी डिजीजच्या रूग्णांमध्ये बॅड कोलेस्ट्रॉलचं प्रमाणही कमी होतं. डाळिंबात असलेले पॉलीफेनॉल्स शरीरात प्लाक जमा होणं रोखतं.

रोज १२० मिली ग्रॅम इतकी दालचिनी पावडर सेवन केल्याने कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइडचं प्रमाण कमी होतं. हेही लक्षात घ्या की, बॅड कोलेस्ट्रॉल हार्ट ब्लॉकेजचं मुख्य कारण होऊ शकतं. याने व्यक्तीच्या हृदयासंबंधी इतरही समस्या वाढू शकतात.

सामान्यपणे असं पाहिलं जातं की, बॅड कोलेस्ट्रॉलमुळे हृदयाची धमण्यांमध्ये अडथळा निर्माण होतो. लाल मिरचीमध्ये कॅप्सेसिन नावाचं तत्व असतं ज्यात हे बॅड कोलेस्ट्रॉलचं प्रमाण कमी करण्याची क्षमता असते. कॅप्सेसिन ब्लड प्रेशर कमी करणे, हाय कोलेस्ट्रॉल आणि रक्ताच्या गाठी तयार होण्यापासून रोखल्या जातात.

लसूण खाल्ल्याने केवळ हृदय निरोगी राहतं असं नाही तर अनेक आजारांपासून बचाव होतो. यात अँटीकोएगुलेंट गुण असतात जे रक्त पातळ करण्यास मदत करतात. या कारणाने लसूण हार्ट अटॅक आणि स्ट्रोकला रोखण्यास सक्षम असतं.

हळदीमध्ये करक्यूमिन नावाचं तत्व असतं ज्यात अँटी-ऑक्सिडेंट, सूज आणि रक्ताच्या गाठी रोखण्याची क्षमता असते. हळदीचं नियमित सेवन केल्याने आरोग्य चांगलं राहतं. याने हार्ट ब्लॉकेजची समस्याही कमी होते.

जर तुम्हाला हृदयासंबंधी समस्या असेल तर तुम्हाला नियमित चांगला आहार घेणं गरजेचं आहे. त्यासाठी तज्ज्ञांच्या सल्ल्याने तुम्ही आहाराचं नियोजन करू शकता.

# वेश्वी, नवेदर-नवगावमध्ये विकास आघाडीचे सरपंच

## अलिबागेतील दोन्ही ग्रामपंचायतीमध्ये शेकापचा पराभव





**अलिबाग : प्रतिनिधी**

शेकापचा बालेकिल्ला असलेल्या अलिबाग तालुक्यातील वेश्वी आणि नवेदर-नवगाव या ग्रामपंचायतिंच्या सरपंचपदाच्या निवडणुकीत विकास आघाडीने शेकापला जोरदार धक्का दिला. या दोन्ही ग्रामपंचायतीमध्ये शेकापचे थेट सरपंचपदाचे उमेदवार पराभूत झाले. वेश्वी ग्रामपंचायत सरपंचपदी विकास आघाडीचे गणेश भालचंद्र गावडे तर नवेदर-नवगाव ग्रामपंचयात सरपंचपदी विकास आघाडीच्या प्रियांती आदर्शन घातकी विजयी झाल्या.

शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांचे वास्तव्य असलेल्या वेश्वी ग्रामपंचायतीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. गेली अनेक वर्षे येथे शेकापची सत्ता आहे. येथे शेकापला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. वेश्वी ग्रामपंचायतीवर सत्ता मिळविण्यात ग्राम परिवर्तन आघाडीला यश आले. आघाडीचे थेट सरपंचपदाचे उमेदवार गणेश गावडे २८१ मताने विजयी झाले आहेत. गणेश गावडे यांना १५७८ तर शेकापचे प्रफुल्ल पाटील यांना १३०७ मते मिळाली. वेश्वी ग्रामपंचायतीच्या ११ पैकी सात सदस्य शेकापचे तर चार सदस्य आघाडीचे निवडून आले.

नवेदर-नवगावमध्येही आघाडीनेच बाजी मारली. थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत आघाडीच्या उमेदवार प्रियंती आदर्शन घातकी ६५५ मतांनी विजयी झाल्या. घातकी यांना १५२५ तर त्यांच्या प्रतिस्पर्धी शेकापच्या उमेदवार अंकिता प्रणय जैतू यांना १०७० मते मिळाली. नवेदर-नवगाव ग्रामपंचायतीच्या ११ पैकी सात सदस्य शेकापचे तर चार आघाडीचे निवडून आले.

या दोन्ही ग्रामपंचायतींची निवडणुक आमदार महेंद्र दळवी आणि शेकापचे आमदार जयंत पाटील यांनी प्रतिष्ठेची बनवली होती. यात आमदार महेंद्र दळवी यांनी बाजी मारली. विजयानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

**अलिबाग तालुक्यातील वेश्वी आणि नवेदर-नवगाव या दोन्ही ग्रामपंचायती शेकापचे बालेकिल्ले होते. या दोन्ही ग्रामपंचायती आम्ही एकत्र येऊन जिंकल्या आहेत. ही अलिबाग तालुक्यातील राजकीय परिवर्तनाची लाट आहे. यापुढे होणाऱ्या निवडणुकादेखील आम्ही एकत्र येऊनच लढावू. जिल्हा परिषद निवडणुकीतदेखील एकत्र येऊन सत्ता मिळवू.**
**-महेंद्र दळवी,**
**आमदार, अलिबाग**

# पन्हळघर बुद्रुक ग्रामपंचायत बाळासाहेबांच्या शिवसेनेने जिंकली

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील प्रतिष्ठेची पन्हळघर बुद्रुक ग्रामपंचायत बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट)ने जिंकली असून या ग्रामपंचायतीत राष्ट्रवादी काँग्रेसचा पराभव झाला.तालुक्यातील देगाव ग्रामपंचायत शेकापने तर पन्हळघर खुर्द ग्रामपंचायत ठाकरे गटाच्या शिवसेनेने जिंकली आहे.

माणगाव तालुक्यातील पन्हळघर बुद्रुक, पन्हळघर खुर्द आणि देगाव या तीन ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी रविवारी मतदान होऊन मतमोजणी सोमवारी (दि. १७) सकाळी माणगाव प्रशासकीय भवन येथील सभागृहात झाली.

नायब तहसीलदार बी. वाय. भाबड यांच्या मार्गदर्शनाखाली देगाव ग्रामपंचायतीचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून किरण पडवलकर, पन्हळघर बुद्रुक ग्रामपंचायतीचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रणजित लवटे तर पन्हळघर खुर्द ग्रामपंचायतीचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विनोद मिंढे यांनी काम पहिले.

पन्हळघर बुद्रुक ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदाच्या निवडणुकीत बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) चे संतोष सीताराम वातेरे (२४२) विजयी झाले. त्यांनी राष्ट्रवादीचे रमेश तुकाराम भोनकर (१५३) यांचा पराभव केला.

करुणा नितेश जाधव, सुजन सुभाष शिगवण, विजया रवी वातेरे, प्रमोद सीताराम नवाले, गेनी गंपू हिलम हे (शिंदे गट) पाच उमेदवार सदस्यपदी बिनविरोध निवडून आले होते. तर सोमवारी झालेल्या मतमोजणीत भारती सुरेश मळेकर, महेश टिकम धाडवे (शिंदे गट) हे ग्रामपंचायत सदस्यपदी विजयी झाले.

आमदार भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या विकासकामांच्या बळावर पन्हळघर बुद्रुक ग्रामपंचायत जिंकल्याचा आपल्याला आनंद होत असल्याचे सांगून जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी सर्व मतदार व कार्यकर्त्यांचे आभार मानले.



# पोलादपूर तालुक्यात चारपैकी तीन सरपंचपदे बाळासाहेबांच्या शिवसेनेकडे

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील तुर्भे खोंडा, तुर्भे खुर्द, तुर्भे बुद्रुक आणि वझरवाडी या चार ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये बाळासाहेबांच्या शिवसेनेने तीन सरपंचपदे जिंकली असून एका ठिकाणी श्रीराम विकास आघाडीचा सरपंच झाला आहे.

### तुर्भे खोंडामध्ये सरपंच व सात सदस्य शिंदे गटाचे

तुर्भे खोंडा येथील थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत शिंदे गटाच्या कविता केशव खेडेकर (१०८ मते) यांनी मविआच्या प्रमिला प्रमोद महाडीक (१०१ मते) यांच्यावर विजय मिळविला.

दीपक खेडेकर, चैताली गोळे, अश्विनी जाधव, निर्मला देवळेकर, रामचंद्र खेडेकर, अनिता गायकवाड आणि गोपाळ खेडेकर हे शिंदे गटाचे सात उमेदवार ग्रामपंचायत सदस्यपदी बिनविरोध निवडून आले आहेत.

### वझरवाडीमध्ये सरपंच शिंदे गटाचा

पोलादपूर तालुक्यातील वझरवाडी ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदाच्या थेट लढतीमध्ये शिंदे गटाचे संभाजी जाधव (३२९ मते) यांनी मविआचे उमेदवार श्रीहास शिंदे (२८५ मते) यांचा पराभव केला. सोमवारी झालेल्या मतमोजणीत वझरवाडी ग्रामपंचायतीमध्ये शिंदे गटाचा सरपंच आणि तीन सदस्य तर महाविकास आघाडीचे ४ सदस्य विजयी झाले.



पोलादपूर तालुक्यातील चार ग्रामपंचायतींच्या निकालामुळे शिंदे गटाचे वर्चस्व स्पष्ट झाले आहे. शिंदे गटाचे प्रतोद आमदार भरत गोगावले आणि माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

| प्रभाग | उमेदवार | मते |
|---|---|---|
| १ अ | कृष्णा जाधव | १११ |
| | **केशव शिंदे** | **१५७ विजयी** |
| १ ब | रेश्मा उतेकर | १३३ |
| | **अश्विनी चव्हाण** | **१४८ :विजयी** |
| १ क | मेघा जाधव | ११० |
| | **वंदना जाधव** | **१४३ : विजयी** |
| २ अ | **विठ्ठल उतेकर** | **९२ : विजयी** |
| | सखाराम जगताप | ७९ |
| २ ब | भारती चव्हाण | ७९ |
| | **श्रध्दा चव्हाण** | **९३ : विजयी** |
| ३ अ | सखाराम चव्हाण | ३२ |
| | **रोहित जाधव** | **१४० : विजयी** |
| ३ ब | **संगिता घोलप** | **१५० :विजयी** |
| | अंजली वायकर | २२ मते |

### तुर्भे बुद्रुकमध्ये तीन बिनविरोध

तुर्भे बुद्रुक ग्रामपंचायतीच्या थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत शिंदे गटाच्या सुरेखा गोळे (३१९ मते विजयी) यांनी निशा शेलार (१७७ मते) यांच्यावर मात केली.

| प्रभाग | उमेदवार | मते |
|---|---|---|
| १ अ | **पूजा गोळे** | **१३२ : विजयी** |
| | किरण गोळे | ११६, |
| | संचिता बेलोसे | ५२ |
| १ ब | **राजेश साळवी** | **बिनविरोध** |
| २ अ | **हेमंत गोळे** | **बिनविरोध** |
| २ ब | **मंगल गोळे** | **बिनविरोध** |
| ३ अ | **रेश्मा मरगजे** | **१३२ : विजयी** |
| | सुवर्णा शेलार | ५२ |
| ३ ब | विकास शिंदे | ६७ |
| | **अशोक शेलार** | **८९ : विजयी** |

### तुर्भे खुर्दमध्ये श्रीराम विकास आघाडीचा सरपंच

तालुक्यातील तुर्भे खुर्द येथे सरपंचपदाच्या निवडणुकीत श्रीराम विकास आघाडीचे गोविंद उतेकर (३३८ मते) विजयी झाले. त्यांनी तुकाराम उतेकर (२८१ मते) यांच्यावर विजय मिळविला.

| प्रभाग | उमेदवार | मते |
|---|---|---|
| १ अ | **अविनाश उतेकर** | **१५१ : विजयी** |
| | ओंकार उतेकर | १४८ |
| १ ब | प्रणिता उतेकर | १२७ |
| | **रेणुका उतेकर** | **१७८ : विजयी** |
| १ क | सुरेखा उतेकर | १०९ |
| | **रंजना मोरे** | **१७३ : विजयी** |
| २ अ | **ओमकार उतेकर** | **१२७ : विजयी** |
| | संजय जाधव | ३९ |
| २ ब | सुमिता उतेकर | ५४ |
| | **चंद्रभागा दळवी** | **११४ : विजयी** |
| ३ अ | **राजेश उतेकर** | **८१ : विजयी** |
| | विशाल उतेकर | ७२ |
| ३ ब | **उषा उतेकर** | **८४ : विजयी** |
| | गुलाब उतेकर | ६९ |

## पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

गेले काही दिवस पडलेल्या परतीच्या जोरदार पावसामुळे शेतकरीवर्गाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे.

यंदा पर्जन्यमान चांगले असल्याने भातपिक उत्तम आले होते. त्यामुळे शेतकरीवर्ग आनंदात होता, मात्र परतीच्या पावसाने त्याच्या आनंदावर विरजण घातल्याचे चित्र आहे.


## CHANGE IN NAME

My Old Name was **ASHADEVI ARUN GAJARE**. As per Deed Pool Affidavit in Front of Executive Magistrate, Panvel, I will be Known as **Mrs. ASHABAI ARUN GAJARE** (Residing at : Flat No. B/003, Parth Ganesh, Plot No.21/24, Sector 8, New Panvel, Tal Panvel, Dist. Raigad-410 206.)

**Mrs. ASHABAI ARUN GAJARE**
(Sd/- New Name)



महावितरण

## निविदा सुचना

अलिबाग विभागाअंतर्गत पीसी-00 ग्राहकांचे एम आर आई रिडिंग घेणेसाठी, वीज देयके छपाई व वाटप करण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे :

| निविदा क्रमांक | कार्यालय |
|---|---|
| एम आर आई - एम आर ९/काअ/अलिबाग/टी-०२/१०-२०२२ | अलिबाग |

अंदाज पत्रकीय रक्कम :- प्रत्येकी ७.०० लाख
निविदा भरण्याची अंतिम दिनांक :- ३१/१०/२०२२
**अधिक माहितीसाठी पुढील संकेत स्थळावर संपर्क साधावा.**
https://etender.mahadiscom.in/eatApp/

**कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग**


# कर्जत : पोटल, पाली ग्रामपंचायतीत आघाडीची सत्ता; एका जागेवर 'कमळ' उमलले

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील पोटल आणि पाली खलाटी या दोन ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी रविवारी मतदान घेण्यात आले होते. सोमवारी (दि. १७) झालेल्या मतमोजणीत पाली खलाटीमध्ये ग्रामविकास आघाडी, तर पोटल ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादी, शिवसेना ठाकरे गट विजयी झाला. पोटलमध्ये वर्षा मिनेश मसणे या भारतीय जनता पक्षाच्या सदस्य निवडून आल्या आहेत. विजयानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

### पोटल ग्रामपंचायतीमधील विजयी उमेदवार

थेट सरपंचपद : मीरा मसणे, ग्रामपंचायत सदस्य : ज्ञानेश्वर तुपे, कृष्णाजी जोशी, सुवर्णा मसणे, वर्षा मसणे, लतीफ कर्णेकर, इस्माईल मालदार, अश्विनी श्रीखंडे

### पाली तर्फे खलाटीमधील विजयी उमेदवार

थेट सरपंचपद : संजना पवार (बिनविरोध), ग्रामपंचायत सदस्य : शिवानी कुंभार, सुनीता देशमुख, सारिका वाघमारे, निर्मला देशमुख, हिराबाई जाधव, तुकाराम भोईर, राम वाघमारे (बिनविरोध)




## पेण तालुक्यात ४१ हजार ५०० रेशन कार्डधारकांना मिळणार दिवाळी शिधाचा लाभ

**पेण : प्रतिनिधी**

राज्यातील शिंदे, फडणवीस सरकारने दिवाळीचे औचित्य साधत अवघ्या १०० रुपयांत रेशनवर धान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. पेण तालुक्यातील सुमारे ४१ हजार ५०० रेशन कार्डधारकांना त्याचा लाभ होणार आहे.

पात्र शिधापत्रिकाधारकांना आगामी दिवाळीनिमित्त एक किलो रवा, एक किलो चणाडाळ, एक किलो साखर व एक लिटर पामतेल या चार शिधाजिन्नसांचे किट वितरित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्याचाच भाग म्हणून पेण तालुक्यामध्ये ४१ हजार ४०६ शिधापत्रिकाधारकांना लाभ मिळणार आहे.

चार शिधाजिन्नसांचा संच अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटूंब तसेच एपीएल (केशरी) शेतकरी योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारकांना प्रती शिधापत्रिका ई-पॉस प्रणालीद्वारे प्रती संच शंभर रुपये या सवलतीच्या दराने वितरित करण्यात येणार आहे. याचा सर्व पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नायब तहसीलदार तथा तालुका पुरवठा अधिकारी सुरेश थळे यांनी केले आहे.

## नेत्रा मेहतांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**महाड : प्रतिनिधी**

महाडमधील कवयित्री नेत्रा मेहता यांनी आपल्या आईच्या प्रथम पुणयस्मरण दिवशी स्वतः लिहिलेल्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नुकतेच एका छोटेखानी कार्यक्रमात झाले. या कार्यक्रमास शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

नेत्रा मेहता या गेली काही वर्षे विविध विषयावर लिखाण करत असून विविध नियतकालिकात त्यांच्या कविता, लेख प्रसिद्ध झाले आहेत. मेहता यांनी नुकताच सुमन गंध हा कवितासंग्रह प्रकशित केला. या पुस्तकाचे प्रकाशन महाड अर्बन बँकेच्या अध्यक्षा शोभाताई सावंत, संचालक काका वैष्णव, नीता शेट, सुनील गांधी, स्नेहा गांधी यांच्या हस्ते झाले. या काव्यग्रंथात नेत्रा मेहता यांनी विविध विषयावरील कविता लिहिल्या आहेत. वाचकांना त्या नक्की पसंतीस येतील, असे या वेळी शोभाताई सावंत यांनी सांगून मेहता यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिया तलाठी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार स्वत: नेहा मेहता यांनी मानले.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती १) सुगंधा पद्माकर पुरव २) सुहास पद्माकर पुरव ३) वासंती मुरलीधर पुरो ४) अंजली बाबुराव चौधरी ५) जयंत मुरलीधर पुरो ६) अविनाश मुरलीधर पुरो ७) संगीता नितीन पट्टेकर ८) प्रतिभा सुरेश पुरो ९) संजय सुरेश पुरो १०) पुष्पा जयराम रेड्डी ११) प्राची अरुण पुरो १२) उल्का मुकुंद पुरो १३) राहुल मुकुंद पुरो १४) सुनिता वैभव डहाके १५) सुबोध अरुण पुरो, यांच्या नावे अधिकार अभिलेखी नमूद असणाऱ्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.ज्यांचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, या पुढे या सर्व जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकती' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-रानवड, ता-उरण व जिल्हा-रायगड**

| भूमापन क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ११९ | ६ | ०.०२.५० पो.ख. ०.००.५० | ०.५० |
| १३२ | ३ | ०.२०.६० पो.ख. ०.०१.०० | ५.६३ |
| १३३ | ४ | ०.०४.०० पो.ख. ०.००.५० | ०.९७ |
| | | **एकूण ०.३१.१०** | |

तरी वरील सदरहू मिळकतींबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हित संबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्वव्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १८/१०/२०२२


**सही /-**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड.
पिन कोड- ४००७०२. मोबाईल नं. ७४०००९७२८६

# एलिफंटा होणार जलसमृद्ध

## बेटावरील ग्रामस्थांची पुढील ४० वर्षांची पाण्याची चिंता मिटणार

**उरण : रामप्रहर वृत्त**

जागतिक कीर्तीचे पर्यटनस्थळ असलेल्या एलिफंटा बेटावरील तीन गावातील ग्रामस्थ व दररोज येणाऱ्या हजारो पर्यटकांची पिण्याच्या पाण्याची नव्या योजनेमुळे व्यवस्था होणार आहे. यासाठी आमदार महेश बालदी यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या जलजीवन मिशनअंतर्गत १७ कोटी ५९ लाख खर्चाच्या घारापुरी नळ पाणीपुरवठा योजनेला कोअर कमिटीनंतर कॅबिनेट बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे बेटावरील तीन गावांचा आणि पर्यटकांचा पुढील ४० वर्षांकरीता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे.



बेटावरील राजबंदर, शेतबंदर, मोराबंदर ही तीन गावे आणि येथे येणाऱ्या पर्यटकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी अनेक वर्षांपासून गावोगावी असलेल्या विहिरी, धरणाचा उपयोग केला जात आहे, मात्र उन्हाळ्यात हे पाण्याचे स्रोत आटत असल्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागते.

पाणीसमस्या कायमची दूर करण्यासाठी तीनही गावे आणि पर्यटकांसाठी घारापुरी नळ पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव राजिपच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे सादर केला होता. २०२१ साली सादर केलेल्या प्रस्ताव खर्चाच्या दृष्टिकोनातून राजिपच्या आवाक्याबाहेर होता. पाच कोटींपेक्षा अधिक असलेल्या खर्चामुळे २९ जून २०२२ रोजी राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी मंजुरीनंतर घारापुरी नळ पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडे पाठविण्यात आला होता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळानेही १७ कोटी ५९ लाख खर्चाचा अंतिम मंजुरीसाठी मंत्रालयाकडे धाडला होता, अशी माहिती महामंडळाचे उपअभियंता नामदेवराव जगताप यांनी दिली.

### अशी राबविणार योजना

**बेटावरील मोरा बंदर येथील मोठा तलावातील पाण्याचा वापर केला जाणार आहे. यासाठी तलावाची खोली वाढविण्यात येणार आहे. त्याभोवती संरक्षक भिंतीसह फिल्टरेशन प्लांटही बसविण्यात येणार आहे.**

# चिनी कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवून ५२ लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

चीनमधील कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवून एका सायबर चोरट्याने तळोजा एमआयडीसीतील फ्लुरो इंजिनियरींग प्रा. लि. या कंपनीला बनावट ई-मेलद्वारे संपर्क साधून या कंपनीला फॅक्टरी ऑटोमेशनसाठी लागणारे पार्ट्स पाठविण्याच्या बहाण्याने त्यांच्याकडून तब्बल ५२ लाख रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तळोजा पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली फ्लुरो इंजिनियरींग प्रा. लि. नावाची कंपनी तळोजा एमआयडीसीत असून या कंपनीकडून फॅक्टरी ऑटोमेशन मशीनसाठी लागणारे पार्ट्स परदेशातून मागवून त्याची देशामध्ये विक्री केली जाते. डिसेंबर २०२१मध्ये देखील फ्लोरो इंजिनियरींग कंपनीने चीनमधील झियान सिल्वरस्टोन मशिनरी को लिमी या कंपनीला नेहमीप्रमाणे ई-मेल पाठवून एकूण ३२,९०४ पार्ट्सची मागणी केली होती. याचदरम्यान अज्ञात सायबर चोरट्याने झियान सिल्वरस्टोन मशिनरी या कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवून बनावट ई-मेल आयडी तयार करून त्याद्वारे फ्लोरो इंजिनियरींग कंपनीला संपर्क साधला, तसेच झियान सिल्वरस्टोन मशिनरी ही कंपनी बंद झाल्याचे व तीच कंपनी एक्सी जिओंगवे ट्रेडींग को. लि. या नावाने सुरू झाल्याची खोटी माहिती दिली. त्यानंतर बँक खात्यात व्यवहाराचे ५२ लाख रुपये (६७१३८.८० युएसडी) पाठविण्याबाबत ई-मेलद्वारे सांगण्यात आले. सायबर चोरट्याकडून देण्यात आलेल्या माहितीवर विश्वास ठेवून फ्लोरो इंजिनियरींग कंपनीने सायबर चोरट्याने दिलेल्या बँक खात्यावर गत जून महिन्यात ५२ लाख रुपये पाठवून दिले. काही दिवसानंतर चीनमधील झियान सिल्वरस्टोन मशिनरी या कंपनीने फ्लोरो इंजिनियरींग कंपनीला फोनवरून संपर्क साधत, त्यांनी दिलेल्या मशीनच्या पार्टसचे पेमेंट अद्याप कंपनीला मिळाले नसल्याचे सांगितले. त्यानंतर फ्लुरो इंजिनियरींग कंपनीने आपल्या व्यवहाराची तपासणी केली असता, त्यांच्या कंपनीची फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर कंपनीच्या संचालकांनी तळोजा पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली.

# नवी मुंबईतील रेल्वेस्थानके, महामार्गांचे होणार सुशोभीकरण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना सर्वोत्तम शहरात राहतोय याचा आनंद देण्यासाठी शहर सुशोभिकरणावर भर देण्यात येणार आहे. विशेषतः शहरातील रेल्वेस्थानक, शिव-पनवेल महामार्गाच्या स्वच्छता आणि सुशोभिकरणावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. नुकतेच महापालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीत आयुक्तांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

नवी मुंबई शहर स्वच्छतेवर बारकाईने लक्ष देतानाच सुशोभिकरणावरही व्यापक स्वरुपात भर दिला, तर नागरिकांना आपण सर्वोत्तम शहरात राहतो याचा आनंद वाटतो आणि हेच शहर सुशोभिकरणामागील मुख्य उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट करीत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी स्वच्छ सर्वेक्षण २०२३मध्ये नवी मुंबई महापालिकेच्या वाटचालीची दिशा स्पष्ट केली.

शहर स्वच्छता व सुशोभिकरणातील कमकुवत बाजू असलेल्या रेल्वेस्थानक आणि शिव-पनवेल महामार्गावर महापालिकेच्या अखत्यारित नसलेल्या दोन बाबींकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.

या दृष्टीने रेल्वेस्थनाक यासाठी सिडको तसेच शिव पनवेल मार्गासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याशी समन्वय साधून शहर सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने सहकार्य घेऊन त्या ठिकाणी स्वच्छता आणि सुशोभिकरण करण्यात येणार आहे. उद्याने व मोकळ्या जागांच्या सुशोभिकरणासाठी विविध नावीन्यपूर्ण संकल्पनांचे छायाचित्रांसह सादरीकरण करण्यात आले व यामध्ये आपली कल्पनाशक्ती मिसळून नवी मुंबई शहर अधिक सुंदर दिसण्यासाठी प्रयत्न करा. आतापासूनच सुशोभीकरणाला सुरुवात करून २५ डिसेंबरपर्यंत सुभोभिकरणाची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## तळोजामध्ये वानरांचा धुडगूस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा औद्योगिक वसाहतीलगत असलेल्या एन. ए. गार्डन या गृहसंकुलात वानरांनी धुडगूस घातला आहे. अन्नासाठी मानवी वस्तीत या वानरांचा वावर असल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील एन. के. गार्डन गृहसंकुलामध्ये वानरांचा वावर वाढला असून हे वानर अन्नासाठी लहान मुले आणि महिलांच्या अंगावर धावून जाण्याचे प्रकार घडल्यामुळे या ठिकाणी भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे वन विभागाने तातडीने याबाबत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# इनरव्हील क्लब पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन कार्यकारिणीची बैठक

**पनवेल : वार्ताहर**



इनरव्हील डिस्ट्रिक्ट ३१३च्या डिस्ट्रिक्ट चेअरमन मुक्ती पानसे यांनी नुकतीच इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनला भेट दिली. त्यांनी सर्व कार्यकारिणी सदस्यांची बैठक घेतली. सर्व पदाधिकारी आणि सदस्यांना क्लबच्या कामकाजाच्या नोंदींबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी सर्व कार्यकारिणी सदस्यांनी अतिशय उत्कृष्ट काम केल्याचे पाहून आनंद व्यक्त करून खूप कौतुक केले.

प्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. क्लब सदस्य डॉ. राजश्री बागडे यांनी अतिशय उत्कृष्ट गणेशवंदना सादर करून सगळ्यांचीच मने जिंकली. या वेळी इनरव्हील डिस्ट्रिक्ट इएसओ डॉ. शोभना पालेकर या आवर्जून उपस्थित राहिल्या. रोटरी क्लबच्या कर्णबधिर निवासी शाळेतील मुलांना शाळेचे गणवेश देण्याचा उपक्रम डिस्ट्रिक्ट चेअरमन मुक्ती पानसे यांच्या हस्ते करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात आणि इतर कलागुणांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या सदस्यांचा सन्मान करण्यात करण्यात आला. अध्यक्षा कल्पना नागावकर यांनी आगामी उपक्रमांबद्दल माहिती दिली आणि सर्व सदस्यांचे अतिशय बहुमोल सहकार्य मिळत असल्याचे सांगून आभार व्यक्त केले. सेक्रेटरी सई पालवणकर हिने सर्व झालेल्या प्रोजेक्टची माहिती नेमक्या शब्दांत उत्कृष्टपणे दिली. क्लब एडिटर शितल गायकवाड संपादित प्रतिबिंब या बुलेटिनचे प्रकाशन डिस्ट्रिक्ट चेअरमन मुक्ती पानसे यांच्या हस्ते झाले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी क्लबचे संपूर्ण कामकाज आणि बुलेटीन अतिशय आवडल्याचे सांगितले. राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

## निवडक

### लोकल गाडीत अनोळखी मृतदेह

**पनवेल :** पनवेल रेल्वेस्टेशन फलाट नं.४ वर आलेल्या लोकलच्या लगेज डब्यात अनोळखी मृतदेह सापडल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. पनवेल रेल्वे स्टेशन फलाट नं.४ वर आलेल्या लोकल गाडीचे मधल्या लगेज डब्यात अनोळखी मृतदेह आढळला आहे. मृतदेह अंदाजे ३० वर्षे, उंची पाच फूट दोन इंच, अंगाने सडपातळ, केस काळे-पांढरे मध्यम, दाढी काळी बारीक, अंगात फिक्कट आकाशी फुल शर्ट, निळी हाफ पँट घातलेली आहे. या मृतदेहाबाबत काही माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक डी. एस. बदाले (मोबाईल क्र. ९५९४९१२२९४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेने एकाचा मृत्यू

**पनवेल :** कुंडेवहाळ गावाजवळ जेएनपीटीकडून पनवेलकडे जाणाऱ्या रोडवर एका अज्ञात वाहनाच्या धडकेने एका अनोळखी इसमाचा मृत्यू झाला आहे. कुंडेवहाळ गावाजवळ कुलवाई माता मंदिर परिसरात जेएनपीटीकडून पनवेलकडे जाणाऱ्या रोडवर एका अज्ञात वाहनाच्या धडकेने एका अनोळखी इसमाचा ज्याचे अंदाजे वय ३०-३५ वर्षे आहे. त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघातानंतर वाहनचालक वाहनासह पसार झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा; हरवलेला मोबाइल प्रवाशाकडे सुपूर्द

**खारघर : प्रतिनिधी,**
**पनवेल : वार्ताहर**

पनवेल ते खारघर दरम्यानप्रवास करणाऱ्या प्रवाशाचा मोबाइल हनुमंत विठ्ठल यमगर यांच्या (एमएच ४६ बिडी ०३०८) रिक्षात विसरला गेला होता. मोबाइल मालक प्रवाशाचा शोध घेत यमगर यांनी तो परत केला आहे.



हा मोबाइल परत करताना या रिक्षाचालकाला चांगलीच कसरत करावी लागली. हा मोबाइल बंद असल्याने हनुमंत यमगर यांनी आपल्या घरी हा मोबाइल चार्ज केला, जेणेकरून ज्याचा मोबाइल आहे त्यांचा फोन येईल व ते संबंधितांना देण्यास सोपे जाईल, मात्र मोबाइल चोरीला गेल्याचे गृहीत धरून मोबाइलमालकाने सिम कंपनीशी संपर्क साधून ब्लॉक केला. यामुळे मोबाइल सीम कार्यान्वित नसल्याने मोबाइल मालकाशी संपर्क कसा साधावा? हा प्रश्न रिक्षाचालक यमगर यांना पडला. याबाबत यमगर यांनी खारघर वाहतूक शाखेचे पोलीस नाईक संभाजी कोळेकर यांच्याशी संपर्क साधला त्यांना हा प्रकार सांगितला. कोळेकर यांनी याबाबत नवी मुंबई क्राईम ब्रॅन्चचे आपले सहकारी पोलीस नाईक संदीप वाघमोडे यांना हा प्रकार सांगितला. वाघमोडे यांनी मोबाइल मालकाचा पत्ता ट्रेस करून मोबाइल मालकाशी संपर्क साधला.

मोबाइलमालक पनवेल शहरातील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाल्यावर शुक्रवारी (दि. १४) खारघर वाहतूक शाखेजवळ मालकास हा मोबाइल परत देण्यात आला. मोबाइल मालकाने रिक्षा चालकास ५०० रुपये बक्षीस स्वरूपात परत केले.


## अतिवृष्टीमुळे डाळींचे दर वधारले

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळीच्या आधीच डाळींच्या दरात वाढ सुरू झाली आहे. यावर्षी अतिवृष्टीमुळे डाळींच्या पिकांनाही फटका बसला असून पावसामुळे अनेक ठिकाणी पीक पाण्याखाली गेले आहे. त्यामुळे डाळींचे उत्पादन कमी होण्याची दाट शक्यता आहे. या सर्वांचा परिणाम डाळींच्या दारांवर होत असून घाऊक आणि किरकोळ दरात वाढ सुरू झाली आहे.

तूरडाळीचा भाव गेल्या आठवड्यात घाऊक बाजारात चार ते पाच रुपयांनी वाढला आहे, तर, किरकोळ बाजारात हे दर १२०, १२५ ते १३० रुपये किलोपर्यंत आहेत. उडीद डाळीचा दर १०५ ते ११० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. दिवाळीत चणाडाळीला सर्वाधिक मागणी असते. त्यामुळे चणाडाळही महागली आहे.

# पाणजे डोंगरी परिसरात दोन कोल्ह्यांचे दर्शन




**उरण : रामप्रहर वृत्त**


पाणजे व डोंगरी गावाच्या शेजारी असलेल्या पाणथळ परिसरात रविवारी (दि. १६) सकाळी दोन कोल्हे जोडीने विहार करताना दिसून आले आहेत.

उरणच्या कांदळवन व खाडी परिसरात काही प्रमाणात आहेत, मात्र रविवारी सकाळी या भागात मासेमारी साठी गेलेल्या स्थानिक मच्छिमारांना प्रथम ते दिसले त्यानंतर त्यांनी येथील पर्यावरणवादी कार्यकर्त्याला याची माहिती दिली.

डोंगरी गावातील मच्छिमार या परिसरात मासेमारीसाठी गेले असता त्यांना हे प्रथम कोल्हे दिसले त्यांनी मला माहिती दिली त्यानंतर मी त्यांचा शोध घेतला असता त्यांची पिल्ले शेजारील गवतात असावीत, अशी माहिती डोंगरी गावातील पर्यावरणवादी कार्यकर्ता पराग घरत यांनी दिली.

# पनवेलमध्ये तरुणाई साकारतेय किल्ले शिवनेरी







**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जागवण्यासाठी पनवेलमध्ये तरुणाईने यंदाच्या वर्षीसुद्धा स्वराज्याची मुहूर्तमेढ ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांनी रोवली तो शिवनेरी किल्ला उभारण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. शहरातील काही तरुणांनी एकत्र येऊन कट्टा परिवार ही संकल्पना सुरू केली आहे. त्या अनुषंगाने ते यंदाही किल्ला उभारत आहेत.

शहारातील विरुपाक्ष मंदिरासमोरील पटवर्धन वाडा येथे मोकळ्या जागेत दररोज १६ ते २० तरुण-तरुणी आपले शिक्षण व उद्योगधंदा सांभाळीत सायंकाळी सदर ठिकाणी एकत्र येऊन हा किल्ला उभारण्याचे काम गेल्या २० दिवसांपासून करीत आहेत. यासाठी ते स्वतःच्या खिशाला चाट देऊन ठराविक रक्कम जमा करून किल्ला उभारणीसाठी आपले योगदान देत आहेत. गेल्या तीन वर्षांपासून ही तरुणपिढी अशाप्रकारे हे वेगवेगळे किल्ले उभारीत आहेत.

पहिल्या वर्षी त्यांना आयोजित किल्ले स्पर्धेत तृतीय बक्षीस मिळाले होते. मागील वर्षी द्वितीय मिळाले होते, तर यंदा प्रथम क्रमांक पटकण्याचा मानस संस्थेचे अध्यक्ष प्रभंजन गाडगीळ यांनी व्यक्त केले आहे. त्याचप्रमाणे कट्टा परिवारातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य असे आठ बाय सहा फुटी असे पोट्रेट बनवणार असून सदर पोट्रेट किल्ल्याच्या बाजूला ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे या किल्ल्याची शोभा आणखी वाढणार असल्याची माहिती सदस्य अमिनेश पटवर्धन यांनी दिली.

# लिमये वाचनालयात वाचन प्रेरणा दिन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्म दिनानिमित्त के. गो. लिमये वाचनालयात वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात बाळासाहेबांची शिवसेनेचे पनवेल महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांनी भाषण केले.

पनवेलचे के. गो. लिमये वाचनालय लवकरच ७५व्या अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहे, अशी माहिती कार्याध्यक्ष विनायक वत्सराज यांनी या कार्यक्रमात दिली. वाचनालयाची उपलब्धता, जनमानसातील त्याचे स्थान आणि महत्त्व, अनेक लेखक, वक्ते यांची जडणघडण वाचनालय आणि ग्रंथालयमुळे भरभराटीस आली. डॉ. अशोक गोडबोले यांचा त्यांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

प्रास्ताविकात काशिनाथ जाधव यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्राचा थोडक्यात परिणामकारक शब्दात आढावा घेतला तसेच डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या पुस्तकाचे वाचन जयश्री शेटे, समर्थ जाधव यांनी केले. काही वाचकांचा पुस्तके भेट देऊन सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या दालनात वैखरी बुक शेलतर्फे विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रसिद्ध पत्रकार गणेश कोळी यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. या वेळी उपाध्यक्ष श्याम वालावलकर, सहकार्यवाह जयश्री शेटे, रमेश चव्हाण, ग्रंथपाल निकेता शिंदे, सहाय्यक ग्रंथपाल शारदा कदम, सेवक संजय दिवटे, वाचकवर्ग उपस्थित होता. संस्थेचे पदाधिकारी सुनील खेडेकर यांनी सर्वांचे आभार मानले.

## महाडच्या काळीज-खरवली ग्रामपंचायतीत

# सरपंच आघाडीचा, तर बहुमत शिंदे गटाचे



**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील महत्त्वाच्या काळीज खरवली ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत थेट सरपंचपदी काँग्रेसचा उमेदवार निवडून आला, तर सदस्य पदाच्या १३ पैकी १० जागा जिंकून बाळासाहेबांची शिवसेनेने बहुमत मिळविले.

महाड तालुक्यातील श्रीमंत आणि शिंदे गटाचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या काळीज खरवली या ग्रामपंचायत निवडनुकीचा निकाल सोमवारी (दि. १७) जाहीर करण्यात आला. थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत समीर महामुणकर (बाळासाहेबांची शिवसेना) समीर महामुणकर यांना १०५३ तर चैतन्य महामुणकर (काँग्रेस, राष्ट्रवादी, उध्दव ठाकरे शिवसेना, मनसे आघाडी) यांना १०९६ मते मिळाली. आघाडीच्या उमेदवाराने केवळ ४० मतांनी विजय मिळवला आहे.

या निवडणुकीत ग्रामपंचायत सदस्यपदी बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) चे १० तर आघाडीचे तीन सदस्य निवडून आले. त्यामुळे काळीज खरवली ग्रामपंचायतीचे थेट सरपंचपद आघाडीकडे गेले असले तरी बहुमत शिंदे गटाचे आहे.

# महाडमधील मनसैनिक भाजपमध्ये

**महाड : प्रतिनिधी**

आमदार प्रविण दरेकर यांच्या वाढदिवसानिमित्त महाड नवेनगर येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांनी नुकताच भाजपत प्रवेश केला.



महाड नवेनगर येथील कट्टर मनसैनिक अमोल सुंभे आणि विजय जाधव यांनी आमदार प्रविण दरेकर यांच्या वाढदिवसादिनी भाजपत जाहीर प्रवेश केला. भाजपचे महाड तालुका उपाध्यक्ष चंद्रजित पालांडे, सरचिटणीस महेश शिंदे आणि शहर अध्यक्ष निलेश तळवटकर यांच्या पुढाकाराने अमोल सुंभे, विजय जाधव हे मनसैनिक भाजपत दाखल झाले. मुंबईत आमदार प्रविण दरेकर यांच्या वाढदिवसादिनी भाजप जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, निलीमाताई राजेय भोसले, तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, वाहतूक सेल जिल्हा अध्यक्ष नाना पोरे, युवा मोर्चाचे सुमेध भोसले, विश्वतेज भोसले, तालुका उपाध्यक्ष ॲड. सुरज जामदार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला.

दरम्यान, आमदार दरेकर यांनी विजय जाधव यांची वाहतूक सेल जिल्हा सरचिटणीस पदी तर अमोल सुंभे यांची कामगार सेलच्या महाड तालुका सरचिटणीस पदी नियुक्ती केली.



# माथेरानमध्ये युवा रुखी गुजराती समाजाचा शिंदे गटात प्रवेश

**माथेरान : रामप्रहर वृत्तसेवा**

येथील युवा रुखी गुजराती समाजाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रविवारी (दि.१६) बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश केला. शिवसेनेच्या शिंदे गटाचे माथेरान शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी त्यांचे पक्षात स्वागत करून कोणत्याही प्रसंगी आम्ही आपल्या सोबत आहोत, असे आश्वासन दिले.

माथेरानमधील वाल्मिकी नगर भागातील युवा रुखी गुजराती समाजाचे अध्यक्ष अंबालाल वाघेला, उपाध्यक्ष अशोक वाघेला, किसन वाघेला, विष्णू वाघेला, माजी अध्यक्ष नारायण पुरबिया, मनोज वाघेला, धीरज वालेंद्र, हृषीकेश वाघेला, उदयसिंग वाघेला, प्रवीण वाघेला, अजय वाघेला, नेहा पुरबिया, गीता वाघेला, मोनिका पुरबिया, गीता पुरबिया, कविता वाघेला यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह रविवारी बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मयुरेश कदम यांनी केले. पक्ष बळकट करण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन माजी नगरसेवक प्रकाश सुतार यांनी बाळासाहेबांची शिवसेनेमध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना केले. यावेळी संदीप शिंदे, गौरंग वाघेला, मयुरेश कदम, अनिकेत जाधव, खालिद शेख, दर्शन घाग, मयुरेश चौधरी, रियान मुजावर आदी उपस्थित होते. युवा सेनेचे निखिल शिंदे यांनी आभार मानले.

# रोह्यातील शिबिरात ६५ जणांचे रक्तदान

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा ब्राह्मण मंडळाने अलिबाग येथील शासकीय रक्तपेढी यांच्या सहकार्याने शहरातील श्री ओंकारेश्वर मंदिरात रविवारी (दि. १६) रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात ६५ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली.



रोह्यातील डॉ. रघुनाथ भट व जिल्हा रक्तसंक्रमण आधिकारी डॉ. दिपक गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. अलिबाग येथील शासकीय रक्तपेढीच्या पथकाने रक्तसंकलनाचे काम केले. या शिबिरात ६५ जणांनी रक्तदान केले. रोह्यातील डॉ. रोहित क्षीरसागर व डॉ. अपूर्वा क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान शिबिराचा समारोप करण्यात आला.

ब्राह्मण मंडळ-रोहा या संस्थेचे अध्यक्ष अमित आठवले, उपाध्यक्ष आनंद काळे, सचिव निखिल दाते, खजिनदार चैतन्य आठवले, कमिटी सदस्य नेहा आवळसकर, विदुला परांजपे, उदय गोखले, सुमित रिसबुड, श्रीनिवास रिसबुड यांच्यासह सर्व ज्ञातीबांधवांनी हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## महाड एसटी आगारात अज्ञात व्यक्तीचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या महाड आगारात रविवारी (दि. १६) दुपारी एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला.

महाड एसटी आगार परिसरात नेहमी फिरणाऱ्या एका अनोळखी वेडसर व्यक्तीचा रविवारी दुपारी झोपलेल्या अवस्थेत मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या बाबत सुनील सुरेश गायकवाड यांनी महाड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. मृत व्यक्तीचे अंदाजे वय ६० ते ६५ आहे. या व्यक्तीला कोणीही ओळखत असेल तर त्यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचा आवाहन करण्यात आले आहे.

# कर्जतमध्ये इनरव्हील क्लबचे शिबिर

## २५ जणांनी केले रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब ऑफ कर्जतच्या वतीने रविवारी (दि. १६) शनी मंदिर सभागृहात रक्तदान शिबिर घेण्यात आले. यात २५ जणांनी रक्तदान केले.

सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा उत्तरा वैद्य यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मालिनी नागडा (शहा) यांनी सर्व प्रथम रक्तदान करून शिबिराचा शुभारंभ केला. विशेष म्हणजे या शिबिरात ज्येष्ठ पत्रकार विजय मांडे यांनी आपले ७०वे रक्तदान केले. रक्त संकलनाचे काम कल्याण येथील संकल्प ब्लड बँकच्या डॉ. सोनाली देसाई, राजशेखर नायर, किर्ती सिंग, समृद्धी देसाई, पार्वती गायकवाड यांनी केले. या वेळी करुणा पराडकर, वनिता सोनी, मोनिका बडेकर, ज्योत्स्ना शिंदे, प्राची चौडीए, अवंतिका गायकर, तन्वी जोशी, मधुरा मुळे, पल्लवी सावंत, शिला गुप्ता, संजीवनी घुमरे, साक्षी अडसुळे, सरस्वती चौधरी, शीतल पाटील, रूपा खन्नाल, वैशाली दांडेकर, आशा ठोंबरे आदी उपस्थित होत्या.



(छाया : विजय मांडे)

## महाड शहरात विवाहितेची आत्महत्या

**महाड : प्रतिनिधी**

शहरातील काकरतळे परिसरातील एका विवाहीत महिलेने रविवारी (दि. १६) रात्री पंख्याला गळफास लाऊन आत्महत्या केली. याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद दाखल करण्यात आली आहे.

महाड शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काकरतळे भागातील साईसागर अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या उमा संजय कासार (वय ३१) या विवाहीत महिलेने रविवारी रात्री ९ ते सोमवारी पहाटे ३ वाजण्याच्या दरम्यान दोरीउडी मारण्याच्या प्लास्टिकच्या दोरीने गळफास लाऊन आत्महत्या केली. याबाबत संजय महादेव कासार यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात खबर दिली त्यानुसार अकस्मात मृत्यू नोंद दाखल करण्यात आली. अधिक तपास सुरू आहे.



# पालीत मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली येथे श्री बल्लाळेश्वर देवस्थान तर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. देवस्थानच्या जुन्या कार्यालयात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली.

या शिबिरात रक्तदाब व मधुमेह तज्ज्ञ डॉ. मनिष वैरागी, बालरोग तज्ज्ञ डॉ. आनंद वागळे आणि पोटविकार मुत्रविकार, मुळव्याध, असिडीटी, किडनी स्टोन, तोंडाचा व थायराईडचा कर्करोग तज्ज्ञ डॉ. अपुर्व भट यांनी रुग्णांची मोफत तपासणी केली. सुधागड तालुक्यातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष वैभव आपटे, विश्वस्त प्रमोद पावगी, अरुण गद्रे, विश्वास गद्रे, अमोल साठे आणि डॉ. पिनाकीन कुंटे यांनी या शिबिराचे नियोजन केले होते. शेखर सोमण, पद्माकर फाटक यांच्यासह देवस्थानच्या कर्मचाऱ्यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# माजी सैनिक शरद कोटकर यांचा रोह्यात सन्मान



(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

भारतीय सैन्य दलातील पंधरा वर्षे देशसेवा बजावल्यानंतर रोहा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले शरद कोटकर (रा. पिंगळसई, ता. रोहा) यांचा रविवार (दि. १६) बामगुडे परिवारातर्फे रोह्यात विशेष सन्मान करण्यात आला.

पिंगळसई येथील केशव कोटकर यांचे सुपुत्र शरद कोटकर हे भारतीय सेना दलाच्या नयन राजपूत रेजिमेंटमध्ये कार्यरत होते. ते १९९२ मध्ये सैन्यदलात दाखल होऊन २०१७ साली सेवानिवृत्त झाले. आपल्या पंधरा वर्षाच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी नागालँड, सिक्कीम, मनिपूर, पौंच रजुरी, पवन डोंढा, कपडावा तसेच आसाममधील दरगा मैला येथे नाईक सुभेदार म्हणून कामगिरी बजावली. निवृत्तीनंतर रायगड जिल्हा मुख्य न्यायाधीशांचे अंगरक्षक म्हणून त्यांनी काम केले. सध्या ते रोहा पोलीस ठाण्यात कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा रविवारी रोह्यात बामगुडे परिवाराने विशेष सन्मान केला. या वेळी पिंगळसई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनंत देशमुख, महेश बामगुडे, रुपेश बामगडे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# अलिबागमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस जागतिक वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून नेहरू युवा केंद्र-रायगड, राजाराम अनंत देसाई मेमोरियल ट्रस्ट-मुंबई, प्रिझम सामाजिक विकास संस्था-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील स्पर्धा विश्व ॲकॅडमीमध्ये शेकडो वाचकांच्या उपस्थितीत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

सुरुवातीला डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे लिखाण अतिशय प्रेरणादायी असून त्यांनी आपल्या बऱ्याच लिखाणामध्ये पुस्तकांचे महत्त्वदेखील सांगितले आहे. एक चांगले पुस्तक हे शंभर मित्रांप्रमाणे असते म्हणून आपण आपल्या शालेय जीवनापासूनच विविध पुस्तक वाचण्यावर भर दिला पाहिजे असे मत स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी यांनी प्रास्ताविकात व्यक्त केले. नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वयक निशांत रौतेला, विद्यार्थी प्रतिनिधी मानसी नागावकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी यांच्यासह शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला.





(छाया : तपस्वी गोंधळी)

# स्कॉटलंडकडून विंडीजचा पराभव

## टी-२० वर्ल्डकपमध्ये सलग दुसऱ्या दिवशी धक्कादायक निकाल




**मेलबर्न : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत धक्कादायक निकालाचे सत्र दुसऱ्या दिवशीही कायम राहिले. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी नामिबियाने आशिया चषक विजेत्या श्रीलंकेला पराभूत केले होते, तर सोमवारी (दि. १७) स्कॉटलंड या लिंबूटिंबू संघाकडून दोन वेळा वर्ल्ड कप उंचावणारा वेस्ट इंडिजचा संघ हरला. जॉर्ज मुन्सी याने फलंदाजीत, तर मार्क वॅटने गोलंदाजीत कमाल दाखवताना विंडीजला पराभूत केले.

प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंडने ५ बाद १६० धावा केल्या होत्या. सलामीवीर जॉर्न मुन्सीने ५३ चेंडूंत नऊ चौकारांच्या मदतीने नाबाद ६६ धावा केल्या. मिचेल जेम्सन (२०), कॅलम मॅकलीओड (२३), कर्णधार रिची बेरींगहॅम (१६) व ख्रिस ग्रेव्हीस (१६*) यांनीही योगदान दिले. विंडीजच्या अल्झारी जोसेफ (२-२८) व जेसन होल्डर (२-१४) यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

विंडीज हे माफक लक्ष्य सहज पार करेल असे वाटत असताना स्कॉटलंडने आश्चर्याचा धक्का दिला. कायले मेयर्स (२०) व एव्हिन लुईस (१४) हे सलामीवीर अपयशी ठरले. त्यानंतर मार्क वॅट व ब्रॅड विल यांनी धक्क्यांमागून धक्के दिले. ५३ धावांवर विंडीजची दुसरी विकेट पडली आणि पुढे ११८ धावांत संघ तंबूत परतला. जेसन होल्डरने ३८ धावा करून अखेरपर्यंत विजयासाठी प्रयत्न केले. वॅटने तीन, विल व मिचेल लिस्कने प्रत्येकी दोन, तर जोश डॅव्ही व साफियान शरीफ यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. स्कॉटलंडने ४२ धावांनी सामना जिंकला.

# सराव सामन्यात भारताची ऑस्ट्रेलियावर मात

## मोहम्मद शमीचे जादुई षटक

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

मोहम्मद शमीच्या शेवटच्या षटकातील जबरदस्त गोलंदाजीच्या जोरावर टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या सराव सामन्यात भारताने गतविजेत्या ऑस्ट्रेलियाला सहा गडी राखून नमविले. शमीने शेवटच्या षटकात ऑस्ट्रेलियाचे एकापाठोपाठ एक असे चार गडी बाद केले. त्यात एक धावबाद होता. भारताने ऑस्ट्रेलियाला १८७ धावांचे लक्ष्य दिले होते. यजमान संघ १८० धावाच करू शकला.

या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताचा कर्णधार रोहित शर्मा आणि केएल राहुल मैदानावर उतरले. ऑस्ट्रेलियाच्या मोठ्या मैदानावर राहुलने उत्तुंग फटके खेचले. त्याने २७ चेंडूंत ५० धावा करताना तीन षटकार व सहा चौकार खेचले. त्या पाठोपाठ रोहित व विराट कोहली यांनी प्रत्येकी १५ धावा केल्या. अष्टपैलू हार्दिक पांड्या हाही लौकीकास साजेसा खेळ करू शकला नाही. त्याने केवळ दोन धावा केल्या. दिनेश कार्तिक याने २० धावांचे योगदान दिले.

धावांचा पाठलाग करताना यजमान ऑस्ट्रेलियाच्या मिचेल मार्श व ॲरोन फिंच यांनी भारतीय गोलंदाजांना चोपत पॉवर प्लेमध्ये ६४ धावा काढल्या. १८ चेंडूंत चार चौकार व दोन षटकारांसह ३५ धावा करणाऱ्या मार्शचा सहाव्या षटकात भुवनेश्वर कुमारने त्रिफळा उडवला. स्टीव्ह स्मिथ ११ धावा करीत युजवेंद्र चहलच्या फिरकीवर त्रिफळाचीत झाला. फिंच एका बाजूने चांगली



फटकेबाजी करीत होता. त्याने अर्धशतक पूर्ण केले. मॅक्सवेलचा १९ धावांवर युजवेंद्र चहलने स्वतःच्याच गोलंदाजीवर झेल सोडला, पण भुवनेश्वर कुमारने १६व्या षटकात मॅक्सवेलला २३ धावांवर बाद केले, तर मार्कस स्टॉयनिस सात धावा करीत अर्शदीप सिंगच्या गोलंदाजीवर बाद झाला.

शेवटच्या दोन षटकात १६ धावांची ऑस्ट्रेलियाला गरज असताना हर्षल पटेलने संथ चेंडूवर फिंचचा त्रिफळा उडवला. त्याने ५४ चेंडूंत सात चौकार व तीन षटकारांसह ७९ धावांची तुफानी खेळी केली. यजमानांना सहा चेंडूंत ११ धावांची गरज असताना मोहम्मद शमी २०व्या षटकात पहिले षटक टाकण्यासाठी आला. विराटने सीमारेषेवर अफलातून झेल घेतला. त्यानंतर ॲश्टन ॲगर धावबाद झाला. पुढील दोन चेंडूत शमीने जॉश इंग्लिस व केन रिचर्डसन यांचा त्रिफळा उडवून टीम हॅट्ट्रिक पूर्ण केली. ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ १८० धावांत माघारी परतला. महत्त्वाच्या क्षणी विकेट्स मिळाल्याने भारताने हा सामना सहा धावांनी जिंकला.

## वर्ल्डकप कॉमेंट्री पॅनेलमध्ये तीन भारतीयांचा समावेश

**सिडनी : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकात पुन्हा एकदा चाहत्यांना क्रिकेटचा पुरेपूर आनंद घेता येणार आहे. एकीकडे चाहत्यांना जिथे क्रिकेटपटूंचा शानदार खेळ पाहायला मिळणार आहे, तिथेच सामन्यादरम्यान त्यांना माजी क्रिकेटपटू आणि नामवंत समालोचकांकडून सामन्याची स्थिती बघायला आणि ऐकायला मिळणार आहे. आयसीसीने टी२० विश्वचषकात सहभागी समालोचकांची यादी जाहीर केली आहे. समालोचकांची या यादीमध्ये भारताच्या हर्षा भोगले, रवी शास्त्री आणि सुनील गावसकर यांचा समावेश आहे.

याशिवाय नुकतेच निवृत्त झालेले इयॉन मॉर्गन, प्रेस्टन मॉमसेन, डेल स्टेन आणि नियाल ओब्रायन यांसारखे माजी क्रिकेटपटूही सामन्यादरम्यान समालोचन करताना दिसतील. टी-२० विश्वचषक स्पर्धेत १६ संघ सहभागी होत आहेत. या स्पर्धेसाठी नामांकित २९ समालोचकांच्या गटात मेल जोन्स, इसा गुहा आणि नताली जर्मनोस महिला समालोचक म्हणून उपस्थित आहेत.

# नेदरलँडचा यूएईवर थरारक विजय

**जिलॉन्ग : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियात सुरू झालेल्या टी-२० विश्वचषकातील पात्रता फेरीतील दुसऱ्या सामन्यात नेदरलँडने यूएईवर तीन गडी राखून रोमांचक विजय मिळवला. जिलॉन्ग येथे झालेल्या या सामन्यात यूएईने नेदरलँड्ससमोर ११२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात नेदरलँड्सने शेवटच्या षटकात लक्ष्य गाठले.

नेदरलँड्सकडून फलंदाजी करताना मॅक्स ओडोड याने सर्वाधिक २३ धावा केल्या. यात त्याने एक षटकार आणि तीन चौकार मारले. त्याच्याव्यतिरिक्त कॉलिन ॲकरमन याने १७ धावा केल्या. स्कॉट एडवर्ड्स १६ धावांवर नाबाद राहिला. टीम प्रिंगलने आणि बॅस डी लीड्स यांनी अनुक्रमे १५आणि १४ धावा केल्या. इतर एकाही फलंदाजाला दोन आकडी



धावसंख्या करता आली नाही. तरीही संघाने शानदार विजय मिळवला.

तत्पूर्वी यूएईच्या कर्णधाराने येथे नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यूएईने संथ पण दमदार सुरुवात केली. सलामीवीर चिराग सुरी २० चेंडूंत १२ धावा करून वॅन डर मर्वेचा बळी ठरला. ३३ धावांवर पहिली विकेट पडल्यानंतर सलामीवीर मोहम्मद वसीम (४१) सोबत काशिफ दाऊद (१५) यांनी डाव पुढे नेला. यानंतर वृत्त अरविंदनेही २१ चेंडूत १८ धावांची खेळी केली. या चार फलंदाजांनी दुहेरी आकडा गाठला, पण सर्वांनी केलेल्या धावांपेक्षा जास्त चेंडू खेळले. याचा परिणाम असा झाला की संघाचा धावगती सर्वकाळ सहाच्या वर जाऊ शकला नाही.

इतर फलंदाज काही धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतले. जवर फरीद (२), बासील हमीद (४), कॅप्टन रिझवान (१) आणि अयान अफजल खान (५) विशेष काही दाखवू शकले नाहीत. यूएईचा संपूर्ण संघ निर्धारित २० षटकात आठ गडी गमावून केवळ १११ धावाच करू शकला. नेदरलँड्सकडून बास डी लीडेने तीन, फ्रेड क्लासेनने दोन बळी घेतले, तर टीम प्रिंगल आणि रॉल्फने प्रत्येकी एक गडी बाद केला.

## ऑनलाइन बुद्धिबळ स्पर्धेत अर्जुनने कार्लसनला हरविले

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारतीय ग्रँडमास्टर अर्जुन एरिगेसीने रविवारी एमचेस जलद ऑनलाइन बुद्धिबळ स्पर्धेच्या प्रारंभिक स्तराच्या सातव्या फेरीत जगज्जेत्या मॅग्नस कार्लसनला पराभूत करीत धक्कादायक निकाल नोंदवला.

१९ वर्षीय एरिगेसी स्पर्धेच्या पहिल्या फेरीत विदित गुजरातीकडून पराभूत झाला होता, मात्र त्याने जोरदार पुनरागमन केले आणि आठ फेऱ्यांनंतर तो पाचव्या स्थानी राहिला. एरिगेसीने रविवारी सातव्या फेरीत कार्लसनला नमवले. त्याचा कार्लसनवर हा पहिला विजय आहे. एरिगेसीने निल्स ग्रँडेलियस (स्वीडन),





डॅनिएल नरोदित्स्की (अमेरिका) आणि कार्लसनला नमवीत सलग तीन गेममध्ये विजय नोंदवले, तर पोलंडच्या यान-क्रिस्तोफ डूडासोबत त्याने बरोबरी साधली.

एरिगेसीचे १५ गुण झाले असून उजबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसात्तोरोव्ह (१७ गुण), शखरियार मामेदयारोव्ह (अजरबैजान) व कार्लसन (दोघेही १६ गुण) आणि डूडानंतर (१५ गुण) पाचव्या स्थानी आहे.

# पनवेलमध्ये बॅडमिंटन स्पर्धेला प्रतिसाद

## परेश ठाकूर यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील कारावली स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने प्रथमच पनवेल बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा पनवेल शहरातील तालुका क्रीडा संकुलात रविवारी (दि. १६) झाली १५ आणि १९ वर्ष वयोगटातील मुला-मुलींचा सहभाग असलेल्या या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ रायगड बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाला.

बॅडमिंटन स्पर्धेतील १५ वर्षाखालील मुलांच्या गटात नीव चंदे याने प्रथम, मुकेश यादवारने द्वितीय, मुलींच्या गटात आर्या गावडेने प्रथम, त्वरिता वॉरियरने द्वितीय, १९ वर्षाखालील गटात नीव चंदेने प्रथम, दिवेयान जेठवाने द्वितीय, मुलींच्या गटात अन्नू कुमारीने प्रथम व



(छाया : योगेश पाटील)

अंजू यल्लाने द्वितीय क्रमांक पटकाविला. या सर्व विजेत्यांचा रायगड बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सन्मानचिन्ह देऊन गौरव केला

बक्षीस वितरण समारंभास भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, महाबाला शेट्टी, डॉ. दीपक पुरोहित, डॉ. मिलिंद घरत, वरप्रसाद राव, सरचिटणीस अमरिश मोकल, के. टी. शेट्टी, योगेश पाटील, विकास पाटील, रथना चौता, राजेश्वरी उन्निकत, सुदीप चौता, सरचिटणीस स्नेहल पाटील, नागराज पाल, सचिव सुनंदा सप्लिंग, नेहा पाल, प्रसाद डला, श्रीशैला भंडारी यांच्यासह पदधिकारी, स्पर्धक उपस्थित होते.

## जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत तीन भारतीयांचा 'सुवर्ण'वेध



**कैरो : वृत्तसंस्था**

जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील १० मीटर एअर रायफल तिहेरी स्पर्धा प्रकारात भारताच्या रुद्रांक्ष पाटील, अर्जुन बाबुटा आणि किरण जाधव यांनी 'सुवर्ण' कामगिरी केली. भारतीय त्रिकुटाने चीनचा १६-१० असा पराभव केला. रुद्रांक्षचे स्पर्धेतील हे दुसरे सुवर्णपदक ठरले.

यापूर्वी स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी रूद्रांक्षने याच स्पर्धा प्रकारातील वैयक्तिक गटात सुवर्णपदक पटकाविले होते. भारताने रविवारी एक रौप्य आणि दोन कांस्यपदकेही मिळविली. स्पर्धेत भारताचे चीनपाठोपाठ दुसरे स्थान कायम असून आतापर्यंत भारताने पाच सुवर्ण, एक रौप्य आणि पाच कांस्यपदके जिंकली आहेत. मन्वी जैन आणि समीर यांनी मिश्र दुहेरीत भारताला पहिले रौप्यपदक मिळवून दिले. पायल खत्री आणि साहिल दुधाने यांनी मिश्र दुहेरीत कांस्यपदक प्राप्त केले.





पनवेल : तालुक्यात झालेल्या एकमेव खेरणे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाजपने बाजी मारली आहे. निकालानंतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. नवनिर्वाचित थेट सरपंच शैलेश माळी व अन्य विजयी उमेदवारांचे भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन केले.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com